# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

## विषय : भारतीय भव - तीर्थ संहिता

श्रीगुरुचरित्र अध्याय १५ - भारतमातेचा **भव**(संसार) उभा करणाऱ्या **तीर्थांची संहिता** (शास्त्रविषय प्रतिपादक मूलग्रंथ).

श्रीगुरुचरित्रकार 'तीर्थयात्रा निरुपण' अध्याय १५ मध्ये तीर्थयात्रेचे सविस्तर विवेचन करताना, भारतवर्षाची भौगोलिक,धार्मिक ओळख सांगतात.

अध्याय १४ मधील वर्णनानुसार, श्रीगुरु श्रीनृसिंह सरस्वती नाशिक क्षेत्राहून पायी तीर्थयात्रा करीत, श्रीवैजनाथ क्षेत्र (मराठवाडा)येथे पोहोचले. (परळी) वैजनाथ क्षेत्र येथे ते गुप्त स्थितीत राहिले, असे श्रीगुरुचरित्रकार श्रद्धने सांगतात.

अध्याय १३ व १४ मध्ये वर्णन केलेली यवन राज्यकर्त्यांची दहशतवादी राजवट पाहिल्यावर, हिंदू धर्माची

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

प्रतिष्ठापना करण्यासाठी, श्रीगुरु वैजनाथ क्षेत्र येथे भूमीगत झाले असावेत. ह्या भूमीगत अवस्थेत, त्यांनी आपल्या सर्व शिष्यांना देशाच्या कानाकोपऱ्यात तीर्थ यात्रा करण्यासाठी पाठविलेले दिसते.

श्रीगुरुचरित्र अध्याय १५ ओवी क्रमांक १८ नुसार, श्रीगुरु सांगतात :-

विशेष वाक्य आमुचें एक। अंगीकारणे धर्म अधिक।
तीर्थें हिंडूनि सकळिक। मग यावें आम्हांपाशीं॥ १५ - १८॥

श्रीगुरुंनी शिष्यांना भरतखंडातील सर्व नद्या व तीर्थक्षेत्र ह्या ठिकाणी धर्माला विशेष अंगीकारुन भेटी द्या, असा आदेश दिला. परधर्मीय राजवटीने दडपला गेलेल्या हिंदू धर्माच्या पुनरुत्थानाचे (पुनः+उत्थानाचे) भूमीगत अवस्थेत श्रीगुरुंनी केलेले दिसते.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

ह्या अध्यायात भारतातील जल संपत्ती, निसर्ग निर्मित तसेच मानव निर्मित क्षेत्रांच्या समग्र माहितीचे संकलन श्रीगुरुचरित्रकारांनी केलेले आहे.

श्रीगुरुचरित्रकारांनी 'तीर्थयात्रा निरुपण' ह्या अध्यायात श्रीनृसिंहसरस्वती (इसवी सन १३७८ ते इसवी सन १४५८) काळातील नद्या व तीर्थक्षेत्र यांच्या वर्णनातून पुढील पिढ्यांच्या हाती सुपुर्त केलेला माहिती खजिना :-

तीर्थयात्रेचा आरंभ (ओवी क्रमांक २६)

१) गंगा नदीवरील तीर्थराज काशीक्षेत्र :-

तीर्थयात्रेच्या सुरवातीस तीर्थराज काशीक्षेत्र (उत्तरप्रदेश) येथील पवित्र गंगा नदीची सेवा करण्यास श्रीगुरु सांगतात.

'गंगा नदीची सेवा म्हणजे गंगा नदी स्वच्छ करणे अपेक्षित असावे.'

काशी ह्या नावाची व्युत्पत्ति 'काशयति प्रकाशयति इति काशी'

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

अर्थ :- तेजोमय प्रकाशित अशी ती काशी

(काश = तेज)

| |
|---|
| संदर्भ : http://www.hindupedia.com/en/Varanasi |

काशी क्षेत्री १२ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग आहे. सध्या ह्या क्षेत्री असलेले काशीविश्वनाथ मंदिर, इंदूरच्या महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी इसवी सन १७८० मध्ये पुनरुज्जिवित (पुनः+उज्जिवित) केलेले आहे.

| |
|---|
| संदर्भ<br>https://en.wikipedia.org/wiki/Kashi_Vishwanath_Temple |

काशी विश्वनाथ मंदिर अनेक वेळेला परधर्मीय आक्रमकांनी उध्वस्त केल्याचा इतिहास आहे. त्यामुळे ओवी क्रमांक २६ मध्ये श्रीनृसिंहसरस्वती काळातील (इसवी सन १३७८ ते इसवी सन १४५८) असल्याने, काशी विश्वनाथाचा उल्लेख नसावा.

---

२) प्रयाग क्षेत्र :- **ओवी क्रमांक** २७, २८, २९

काशीक्षेत्रात गंगा नदीची सेवा चाकरी केल्यानंतरचे क्षेत्र प्रयाग.

काशी येथून गंगा तीरावरुन यात्रा करीत, प्रयाग क्षेत्रास जा. असे श्रीगुरु सांगतात.

प्रयाग येथे गंगा, यमुना व सरस्वती नदी (काल्पनिक अस्तित्व) यांचा त्रिवेणी संगम प्रसिद्ध आहे.

१) गंगा नदी :-

भूगर्भ शास्त्रानुसार १० दशलक्ष वर्षांपूर्वी, हिंदीमहासागरातून उत्तरेकडे सरकत आलेला गोंडवनाचा भूगर्भीय स्तर युरेशियन खंडाच्या स्तरावर आदळून हिमालय पर्वताची निर्मिती झालेली असावी. हिमालय पर्वत निर्मिती नंतर गंगा नदीची निर्मिती झालेली असावी.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

संदर्भ : https://en.wikipedia.org/wiki/Himalayas

देवप्रयाग येथे होणारा भागिरथी व अलकनंदा नद्यांच्या संगम हे गंगा नदीचे उगम स्थान आहे. भागिरथी नदी ही गंगोत्री, गढवाल हिमालय येथील गोमुख (गो=गाय + मुख=तोंड) येथून उगम पावते. अलकनंदा नदी ही नंदादेवी त्रिशुल व कामेत ह्या हिमशिखरांच्या पाण्यातून उगम पावते.

भारतातील सर्वात मोठी नदी असलेल्या गंगेच्या प्रवाहाची लांबी २५१० कि. मीटर असून तिचा गंगासागर पश्चिम बंगाल येथे बंगालच्या उपसागरात संगम होतो.

संदर्भ https://en.wikipedia.org/wiki/Ganges

-----------------------------------------------------------

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

२) यमुना नदी :-

यमुना नदीचा उगम उत्तराखंड येथील हिमालय रांगा मधील यमुनोत्री येथून होतो. यम ह्या शब्दाचा संस्कृत अर्थ जुळे असा आहे. यमुना नदी गंगा नदीला समांतर वहात असल्याने, गंगेची जुळी नदी म्हणून ह्या नदीला यमुना नदी असे नाव पडलेले असावे.

(आजच्या आधुनिक युगात उपग्रह छायाचित्रांद्वारे यमुना नदी गंगा नदीला समांतर आहे, हे समजते. परंतु अतिप्राचीनकाळी गंगा व यमुना या नद्यांचा समांतर प्रवाह कसा समजला असेल ? )

हिमालयातून उगम पावणाऱ्या यमुना नदीचे पाणी स्वच्छ आहे. परंतु पुढील प्रवाहात विविध ठिकाणांचे सांड पाणी सोडल्याने, ते दुषित होते.

| |
|---|
| संदर्भ https://en.wikipedia.org/wiki/Yamuna |

३) गुप्त सरस्वती नदी :-

वेदातील नदीस्तुती स्तोत्रात सरस्वती नदीचा उल्लेख आहे महाभारत काळात ही नदी लुप्त झालेली असावी. ISRO व ONGC यांच्या उपग्रह छायाचित्रांनुसार पश्चिमेला सतलज नदी व पूर्वेला यमुना नदी ह्या दोन नद्यांच्या प्रवाहामधील क्षेत्रातून घग्गर हकरा नदीच्या प्रवाहमार्गावरुन सरस्वती नदी वहात असावी. सध्या पावसाळ्यात वाहणारी घग्गर हकरा ही नदी हिमालयाच्या शिवालिक पर्वतरांगांमधून उगम पावते.

सध्या पावसाळ्यात वाहणारी घग्गर हकरा ही नदी हिमालयाच्या शिवालिक पर्वतरांगांमधून उगम पावते. पृथ्वीच्या भूगर्भीय हालचालींमूळे सरस्वती नदी लुप्त होऊन जैसलमेर राजस्थान येथे थरचे वाळवंट निर्माण झाले असावे.

संदर्भ : https://en.wikipedia.org/wiki/Sarasvati_River

https://en.wikipedia.org/wiki/GhaggarHakra_River

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

सरस्वती नदी म्हणजे भूमीवरील गंगा नदी आहे, असे सांगून श्रीगुरुचरित्रकारांनी प्रयाग क्षेत्रात गंगा व यमुना ह्या दोन नद्यांच्या संगमात लुप्त झालेल्या सरस्वती नदीची आठवण ठेवा, असा संदेश दिलेला आहे.

-----------------------------------------------------------

काशी व प्रयाग क्षेत्र येथील तटाक तीर यात्रा केल्यानंतर सर्व शिष्यांनी भारतभर भ्रमण करावे. हिंदू धर्म जागृतीचे कार्य करताना, एका ठिकाणी ५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी राहू नये. हे तीर्थयात्रेचे नियम पाळून कोणी कोणत्या भागात तीर्थयात्रा करायची ? हे बंधन श्रीगुरु घालीत नाहीत.

श्रीगुरुंनी शिष्यांना भारतातील विविध नद्या व तीर्थक्षेत्रांची माहिती दिलेली दिसते.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

वरुणा नदी कुशावर्ती (**ओवी क्रमांक** ३१,४५) :-

ब्रह्म पुराण अध्याय ८९ श्लोक क्रमांक ४५ नुसार

अरुणावरुणानद्योर्गङ्गायां संगमः शुभः।

देवानां तत्र तीर्थानामागतानां पृथक्पृथक्॥८९-४५॥

ह्या श्लोकाचा अर्थ आहे, अरुणा व वरुणा ह्या नद्यांच्या संगमस्थानी गंगा नदीचा होणारा संगम शुभ आहे. त्या ठिकाणी त्या संगमस्थानी देव परत-परत येत असत.

गोदावरी नदीस ‘दक्षिणवाहिनी गंगा’ म्हणतात. ही नदी अरुणा व वरुणा यांच्या नाशिकक्षेत्री असलेल्या संगमात उगम होत असावी. पुराणकाळात नाशिकक्षेत्री मोठे जलाशय असावे. हे सरोवर निर्माण करणारी अरुणा नदी काळाच्या ओघात लुप्त झालेली दिसते. सध्या ब्रह्मगिरी पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या कुशावर्त कुंडात दिसणाऱ्या वरुणा नदीस ‘गोदावरी

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

नदी’ म्हणतात.गोदावरी नदी ब्रह्मगिरी पर्वतावरील लाव्हारसात जटामंदिर, गंगाद्वार, गोमुख ह्या ठिकाणी उगम पावते.

भूगर्भशास्त्र अनुमानानुसार, दख्खनचे पठार निर्मितीच्या वेळी झालेल्या ज्वालामुखीतून ब्रह्मगिरी, अंजनेरी, निलय ह्या पर्वतरांगांची निर्मिती झाली. ज्वालामुखीतून बाहेर पडलेल्या लाव्हारसाने, ब्रह्मगिरी पर्वत रांगा आच्छादित झाल्या. ह्या लाव्हारसात पावसाचे पाणी धरुन ठेवण्याची क्षमता असल्याने गोदावरी व वैतरणा ह्या दोन नद्यांचा उगम ब्रह्मगिरी पर्वतावर होतो.

जटामंदिर ह्या स्थानी लाव्हारसात असलेल्या चिरांमुळे जटासदृश्य रचना दिसते, म्हणून ह्या स्थानास ‘जटामंदिर’ म्हणत असावेत.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा                    तीर्थयात्रानिरुपण

जटामंदिर, गंगाद्वार, गोमुख ह्या ठिकाणी सदैव पाण्याचा उगम लाव्हारसात दिसतो

भविष्यात गोदावरी नदी व वैतरणा नदी सदैव प्रवाहित ठेवण्यासाठी, ब्रह्मगिरी पर्वतरांगावर मानवाने जंगलतोड करु नये, तसेच ब्रह्मगिरी पर्वतरांगावर, सिमेंटचे जंगल अथवा डांबरी अथवा सिमेंटकाँक्रिटच्या रस्त्यांची बांधकाम करु नयेत, ही विनंति.

ब्रह्मगिरी पर्वतावरुन ही नदी तीन प्रवाहात उतरते. ह्यापैकी एका प्रवाहातून वैतरणा नदी तयार होते.

उरलेल्या दोन प्रवाहांपैकी एक प्रवाह चक्रतीर्थ येथे येतो. दुसरा प्रवाह ब्रह्मगिरी पर्वतातून येऊन कुशावर्त कुंडात दृष्टीस पडतो.

कुशावर्त कुंडात उगम पावणारी वरुणा नदी उर्फ सध्याची गोदावरी नदी जमिनीखालून वहात जाऊन चक्रतीर्थ येथे

प्रवाहित होताना दिसते, असा त्रिंबकेश्वर येथे प्रवाद आहे. त्रिंबकेश्वर येथील जमिनीत गाळाचा थर खाली पोकळ व दाट असेल तर वरुणा नदी जमिनीखालून वहात येऊन चक्रतीर्थ ह्या खडकाळ भागात प्रकट होत असावी.

पुराणकालीन तसेच श्रीगुरुचरित्रकालीन असलेली वरुणा नदी म्हणजे आजची गोदावरी नदी होय.

-----------------------------------------------------

शतद्रु (अर्वाचीन नाव सतलज) नदी (**ओवी क्रमांक** ३१) :-

शतद्रू नदीचे हल्लीचे नाव सतलज नदी आहे ही नदी तिबेटमध्ये रक्षस्थल सरोवरातून उगम पावते. हिमाचल प्रदेश, पंजाब अशी वहात येते. मोखू फिरोजपूर, पंजाब येथे सतलज नदीला बीयास ही उपनदी मिळते.सतलज नदी चेनाब नदीला मिळते. सतलज चेनाब

व ह्या दोन्ही नद्यांच्या संगमातून तयार होणारी पंजनाद नदी सिंधू नदीला मिळते.

| |
|---|
| संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Sutlej |

----------------------------------------------------

विपाशका (अर्वाचीन नाव बियास) नदी (**ओवी क्रमांक** ३१) :-

विपाशका ह्या नदीचे वेदकालिन नाव विपाशा असून अर्वाचीन नाव बियास नदी आहे. ही नदी कुलू टेकड्यांमधील रोहतांग खिडीजवळील बियास कुंडातून उगम पावते. ह्या नदीच्या प्रवाहाची लांबी ४७० कि. मीटर असून, शेवटी पंजाबमधील कपुरथला जिल्हाजवळ सतलज नदीला मिळते.

बियास नदीचे मूळचे नाव व्यास नदी असून ती व्यास कुंड येथून उगम पावते. बोलीभाषेत व्यास ह्या शब्दाचे रुपांतर बियास असे झालेले आहे.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

इसवी सन पूर्व ३२६ च्या सुमारास जग जिंकायला निघालेल्या अलेक्झांडरला बियास नदीने भारतावर स्वारी करण्यापासून रोखले होते. ही नदी ओलांडताना अलेक्झांडरच्या सैन्याला खूप त्रास झाला. त्यांनी पुढे जायला नकार दिला. अलेक्झांडरने स्वतःला तीन दिवस तंबूत बंदिस्त करुन घेतले, परंतू सैन्याच्या ठाम नकारामुळे, अलेक्झांडरला बियास नदी पासून परत जावे लागले.

बियास नदीच्या वेगवान प्रवाहाने भारताभोवती अलेक्झांडरला आपले पाश आवळण्यापासून रोखले व आपले नाव विपाशा सार्थ ठरविले.

बियास नदीवर हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर निर्माण करणारा प्लांट जलविद्युत जनित्र आहे.

संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Beas_River

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

वितस्ता (अर्वाचीन नाव झेलम) नदी (**ओवी क्रमांक** ३१):-

वितस्ता नदीचे हल्लीचे नाव झेलम असून ही नदी सिंधू नदीची उपनदी आहे. झेलम नदीचा उगम काश्मिरमधील वेरीनाग येथून उगम पावते. वेरीनाग हे ठिकाण श्रीनगरपासून सुमारे ८०कि. मीटर अंतरावर आहे. झेलम नदीचे उगम स्थान असलेले वेरीनाग हा तलाव मुगल बादशहा जहांगीर ह्यांनी बांधलेला आहे. अष्टकोनी रचनेतील तलावाभोवती पाइन वृक्ष आहेत. काश्मीरचे निसर्ग सौंदर्य लाभलेल्या ह्या तलावाचे पाणी शांत स्वच्छ चमकते.

जग जिंकण्यास निघालेल्या अलेक्झांडरने इसवी सन पूर्व ३२६ मध्ये ही नदी ओलांडल्यावर अलेक्झांडर पुरु राजा यांच्यातील इतिहासप्रसिद्ध युद्ध ह्या नदीच्या काठी झाले होते.

संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Jhelum_River

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

शरावती नदी (**ओवी क्रमांक** ३१):-

कर्नाटकातील तीर्थहली तालुक्यातील अंबुतीर्थ येथून उगम पावणारी नदी संपुर्णपणे कर्नाटकाच्या पश्चिम घाटातून वाहते.

शरावती नदीत दोन प्रकारचे दगड आढळतात. ह्या दगडातील एका प्रकारात लोह मॅगेनीजचे प्रमाण भरपूर आहे तर दुसऱ्या प्रकारच्या दगडात ग्रॅनाइट तसेच मिगमेटीट इत्यादी आढळते.

ह्या नदी सानिध्यात दुर्मिळ प्राणी व वनस्पती यांची जैवविविधता आढळते. समुद्ध जंगलसंपत्ती असलेल्या शरावती नदीकाठील जंगलात सिंहासारखी शेपुट असलेली माकडे, सिंह, जंगली कुत्रा, ठिपके असलेली हरीण, सांबर, नाग इत्यादी प्राणी आढळतात.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

भारतातील नंबर २ असलेला जोग फॉल्स हा धबधबा शरावती नदीवर सागर तालुक्यात आहे. ‘जोग’ ह्या शब्दाचा कानडी भाषेत ‘धबधबा’ असा अर्थ आहे. ह्या धबधब्यात सुमारे २५३ मीटर उंचीवरुन शरावती नदीचे पाणी पडते.

शरावती नदीच्या प्रवाहाची लांबी १२८ कि. मीटर असून होन्नावर जिल्ह्यात ही नदी अरबी समुद्राला मिळते.

ह्या नदीच्या मातीत लोह आणि ॲल्युमिनियम यांचे प्रमाण भरपूर आढळते.

ह्या नदीवर शरावती, लिंगनामक्की धरण, गेरुसोप्पा धरण असे तीन जलविद्युत निर्मिती करणारे प्रकल्प चालतात.

| |
|---|
| संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Sharavati<br>https://en.wikipedia.org/wiki/Jog_Falls |

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

मरुद् वृधा (अर्वाचीन नाव मारिव सुदीर) नदी **(ओवी क्रमांक** ३२):-

ही नदी भोट कोल लानव्हिला पास जवळील समुद्रसपाटीपासून ४४२१ मीटर उंच असणाऱ्या सगा ह्या हिमखंडापासून उगम पावते. किश्तवार भागातील ही मोठी नदी असून ह्या नदीच्या काठी छत्रू हे छोटे गाव आहे. हे ठिकाण दोन टेकड्यांमधील दरीत वसलेले असून हा मार्ग प्राचीन काळापासून काश्मीरमध्ये जाण्यासाठी वापरला जातो. ह्या मार्गावर प्राचीन काळी घनदाट जंगल होते. हे ठिकाण सफरचंद, अक्रोड, राजमाश, गुच्ची ह्या फळांसाठी प्रसिद्ध आहे. ह्या परिसरातील लोक शेती संबंधित वस्तू व प्राणी यांचा व्यापार करतात.

संदर्भ :- http://mykishtwar.com/blog/?p=41

---

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

असिक्नी (अर्वाचीन नाव चेनाब) नदी**(ओवी क्रमांक** ३२) :-

हिमालय पर्वतरांगांमधील बारालचा दरीमध्ये समुद्रसपाटीपासून ४९०० मीटर उंचीवर चंद्रा आणि भागा ह्या नद्या उगम पावतात. ह्या दोन्ही नद्यांचा तांदी ह्या ठिकाणी संगमातून चेनाब नदीचा प्रवाह उगम पावतो. ही नदी किश्तवार जम्मु काश्मिर, पंजाब अशी वहाते. ह्या नदीला ट्रिमू येथे झेलम नदी येऊन मिळते. नंतर अहमदपूर सयाल येथे रवी नदी चेनाब नदीला येऊन मिळते. पाकिस्तान येथील उक शेरिफ येथे ह्या नदीचा सतलज नदीशी संगम होतो.

फिरोजपूर येथे सतलज नदीला चिनाब नदी मिळालेली असल्याने पंचनद म्हणजे पाच नद्यांचा संगमातून तयार होणारी चेनाब नदीचा सिंधू नदीत मिठानकोट, पाकिस्तान येथे संगम होतो.

संदर्भ : https://en.wikipedia.org/wiki/Chenab_River

------------------------------------------------------------

मधुमती नदी (**ओवी क्रमांक** ३२ ):-

मधुमती नदी ही पाकव्याप्त काश्मिरमध्ये आहे. नीलम खोऱ्यातील किशनगंगा(निलम नदी) आणि मधुमती नद्यांच्या संगमावर असलेल्या शार्दी गावात अतिप्राचीन शारदास्थान आहे. हे स्थान बारामुल्ला पासून ६०मैल अंतरावर आहे. शक्ती पीठ असलेले हे स्थान हिंदू, बौद्ध व जैन धर्मांचे अभ्यासकेंद्र म्हणून प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. येथे असलेल्या शारदादेवीच्या प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार काश्मिरचे महाराजा गुलाबसिंग यांनी केलेला आहे.

संदर्भ :-

http://www.koausa.org/Temples/sharadha.html

https://en.wikipedia.org/wiki/Sharada_Peeth

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

पयस्वी नदी (अर्वाचीन नाव चंद्रगिरी नदी) (**ओवी क्रमांक** ३२ ):-

चंद्रागिरी नदी कर्नाटकातील कोडागू जिल्हातील कोइनाडू येथे उगम पावते. तामीळनाडू व मल्याळम राज्याच्या सरहद्दीवरुन वाहणारी चंद्रागिरी नदी कासारगुड जिल्हा केरळ येथून वहात जाऊन अरबी समुद्राला मिळते. ह्या नदीकाठी १७व्या सतकातील चंद्रागिरी किल्ला आहे. चंद्रगुप्त मौर्य याने आयुष्याचे अखेरचे काही दिवस ज्ञान साधनेसाठी या नदीकाठी काढले होते, अशी वदंता आहे. चंद्रागिरी नदीला कासारगुड जिल्ह्यात 'पयस्विनी' असे नाव आहे

संदर्भ :-

http://wikimapia.org/river/15466122/Payaswini-River-Chandragiri-Puzha-in-Kerala

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

महा नदी (**ओवी क्रमांक** ३६) :-

छत्तीसगड, ओरिसा ह्या राज्यातून वहाणारी ‘महानदी’, ही मोठी नदी आहे .महानदीचा उगम छत्तीसगड राज्यातील धरमतरी जिल्ह्यातील, सिंहावा नामक पर्वतरांगात होतो. ह्या पर्वतरांगामधून येणाऱ्या विविध प्रवाहातून महानदी उगम पावते, त्यामुळे महानदीचा उगमाचे ठिकाण मिळत नाही.

पैरी आणि सोढुर ह्या उपनद्या मिळाल्यावर सिरपुर जिल्ह्यात महानदी नावाप्रमाणे महा रुप धारण करते. शिवनाथ, हसदेव, अरपा, जोंक, तेल ह्या महानदीच्या उपनद्या आहेत.

कटक शहरात प्रवेश करण्याआधी महानदीचा डेल्टा प्रदेश सुरु होतो. कटक शहराजवळ महानदीचे दोन प्रवाहात रुपांतर होते. त्यातील एका प्रवाहाचे नाव ‘काथजोरी’ आहे.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

काथजोरी ह्या प्रवाहातून कौकाइ, देवी, सुरुआ प्रवाह तयार होतात. हे सर्व प्रवाह पुरी जिल्ह्यात बंगालच्या उपसागराला मिळतात.

महानदीचे इतर प्रवाह पालका, बिरुपा, चित्रोप्ताला, गेन्गुति, लुन असून हे प्रवाह बंगालच्या उपसागराला मिळतात. ह्या प्रवाहातील बिरुपा प्रवाह व ब्रह्माणी नदी ह्यांचा संगम कृषनगर येथे होऊन धम्रा येथे ब्रह्माणी नदी बंगालच्या उपसागराला मिळते.

महानदीचे अनेक प्रवाहात रुपांतर होऊन हे सर्व प्रवाह फॉल्स पॉइंट जगतसिंगपूर येथे बंगालच्या उपसागराला मिळतात.

नदी समुद्राला ज्या ठिकाणी मिळते, त्या जागेला नदीचे मुख म्हणजे वक्र म्हणतात. महानदी विविध प्रवाहांनी,

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

हजारो ठिकाणी बंगालच्या उपसागराला मिळत असल्याने, श्रीगुरुचरित्रकार महानदीस सहस्त्रवक्रा म्हणतात.

संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Mahanadi

---------------------------------------------------

सिंधू नदी (**ओवी क्रमांक** ३६) :-

ऋग्वेदात सिंधू नदीचा ९६ वेळेला पुलिंगी उल्लेख असल्याने श्रीगुरुचरित्रकार सिंधू नदीस येर म्हणजे तो म्हणतात. ऋग्वेदात 'ब्रह्मपुत्र' ह्या नदीला पुलिंगी नद म्हटलेले आहे. सिंधू सोडल्यास इतर नद्यांना स्त्रीलिंगी 'देवी' म्हटलेले आहे. सिंधू नदीला 'मर्दानी लिंगाची' नदी असा उल्लेख आहे.

सिंधू शब्दाचा अर्थ सिम म्हणजे पूर्ण व धू म्हणजे जिंकणे म्हणून सिंधू ह्या नदीला श्रीगुरुचरित्रकार पूर्णा + पुण्य म्हणजे गुणवान् नदी असे म्हणतात.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

सिंधू नदी सेंन्गे झांग्बो, तिबेट तसेच गर, तिबेट येथे उगम पावते. ह्या नदीला पंचनद येथे सतलज, चेनाब, झेलम, रवी ह्या उपनद्या मिळतात. सोन, कृष्णगंगा, द्रास, सुरु इत्यादी उपनद्यांनी तयार होणारी सिंधू नदी पाकिस्तानातील सिंधू नदी डेल्टा येथे अरबी समुद्राला मिळते.

नोव्हेंबर २०११ च्या उपग्रहछायाचित्रानुसार सिंधू नदीचा प्रवाह २०० वर्षांनी परत पश्चिम दिशेकडे (भारतात) स्थलांतरीत झालेला आहे. हा प्रवाह कच्छचे रण तसेच नल सरोवर पक्षी अभयारण्य गुजराथ ह्या भागातून वहात अरबी समुद्राला मिळतो.

संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Indus_River

---------------------------------------------------------

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

बाहुदा नदी(**ओवी क्रमांक** ३६) :-

बाहुदा नदी पूर्व घाटातील रामगिरी डोंगरात (गजपति जिल्हा, ओरिसा )उगम पावते.

बाहुदा नदीकाठी चित्तुर गावापासून ११ कि. मीटर अंतरावर कानिपकम येथे स्वयंभू विनायक मंदिर आहे. ह्या मंदिरातील वरदसिद्धी विनायक सत्याचा धारक आहे, अशी श्रद्धा आहे

लोकांमधील मतभेद सोडविताना ह्या विनायकासमोर त्या लोकांना प्रतिज्ञा करायला लावून सोडविले जातात.

एखाद्या व्यक्तिला स्वतः केलेल्या पापातून मुक्ती हवी असल्यास, ती व्यक्ती ह्या वरदसिद्धी विनायक मंदिराजवळील बाहुदा नदीत डुबकी मारल्यानंतर मंदिरात गणपतीचे दर्शन घेते.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

लोकांची श्रद्धा आहे की, हा विनायक अदृश्यपणे पापी व्यक्तीच्या मनात पश्चातापाची भावना निर्माण करुन, त्या व्यक्तीला मनातील अपराधी भावना दूर करतो.

म्हणून श्रीगुरुचरित्रकार बाहुदा नदीला अरुणा (अ + रुणा= झुरणी, सतत होणारे दुःख) नदी म्हणतात. ही नदी माणसाच्या मनाला लागलेली पश्चातापाची झुरणी दूर करते.

बाहुदा नदी आंध्र प्रदेशात बंगालच्या उपसागराला मिळते.

संदर्भ :-

https://en.wikipedia.org/wiki/Geography_of_Odisha

https://en.wikipedia.org/wiki/Vinayaka_Temple,_Kanipakam

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

पुष्कर तीर्थ (**ओवी क्रमांक** ३८,४२) :-

पुष्कर हे स्थान अजमेर जिल्हा, राजस्थान येथे आहे. अजमेर पासून सुमारे १४ कि. मीटर अंतरावर पुष्कर ह्या ठिकाणी पुष्कर सरोवर आहे. ह्या सरोवरास 'पुष्कर राज तीर्थ' असे म्हणतात. पुष्कर हे नाव पुष्करणी म्हणजे तळे ह्या अर्थी पडले असावे.

पुष्कर येथे ब्रह्मदेवाचे १४व्या शतकातील मंदिर आहे. ब्रह्मदेवाची मंदिरे क्वचित आढळतात. पुष्कर येथे ब्रह्मदेवाची पत्नी सावित्री हिचे मंदिर आहे.

कार्तिक महिन्याच्या शुक्लपक्षातील नवमी पासून पौर्णिमेपर्यंत ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्याच्या सुमारास पुष्कर येथे पाच दिवस जत्रा भरते. ह्या जत्रेत आजूबाजूच्या खेड्यातून येणारे सजविलेले उंट हे विशेष आकर्षण असते.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

**सन्निहिता नदी= सत्** (अस्तित्व) + **निहिता** (ठेवलेले) + **नदी** (पाण्याचा मोठा प्रवाह)

शिवशंकराच्या सती नामक पत्नीने माहेरी दक्षाकडून (वडिलांकडून) झालेला अपमान सहन न झाल्याने दक्षाच्या यज्ञांत स्वतःची आहुती दिली सतीच्या मृत्युची वार्ता कळाल्यावर शंकराला खूप दुःख झाले. शिवशंकर पत्नी वियोगाने खूप काळ पर्यंत हमसाहमशी रडले. शिवशंकराच्या अश्रूंमधून अजमेर येथील सरोवर तयार झाले, अशी आख्यायिका आहे.

म्हणून अजमेरचे शिवशंकराच्या अश्रूंमधून अस्तित्वात आलेले पुष्कर तीर्थ तेजस्वी आहे असे श्रीगुरुचरित्रकार म्हणतात.

| |
|---|
| संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Pushkar |

--------------------------------------------------------

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

## फल्गु नदी - गया तीर्थ (**ओवी क्रमांक** ३८) :-

वायु पुराणातील गया महात्म्यानुसार फल्गु नदी ही श्रीविष्णुचे मूर्त स्वरुप असल्याने, श्रीगुरुचरित्रकार गया येथील फल्गु नदीस सगुणी म्हणतात.

बिहार राज्यातील गया क्षेत्री, लिलाजन नदी व मोहना नदी ह्या नद्यांच्या संगमात फल्गु नदीचा उगम होतो. फल्गु नदी शेवटी पुनपुन नदीत संगमित होते.

| |
|---|
| संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Phalgu |

----------------------------------------------------------

## रामेश्वरीचा सेतूबंध (**ओवी क्रमांक** ३९) :-

राम रावण युद्धात रामेश्वरम् येथील धनुष्यकोटी पासून श्रीलंकेला जाण्यासाठी समुद्रामध्ये श्रीरामचंद्रांनी रामसेतू

पूल बांधला. ह्या पूलाचे अस्तित्व मन्नारच्या आखातात उपग्रह छायाचित्रांमध्ये दिसते.

बिभीषणाला भिती वाटली की, ह्या पुलावरुन लोक सतत त्याच्या श्रीलंका ह्या राज्यात येतील.बिभीषणाच्या विनंतिनुसार श्रीरामप्रभूनी धनुष्यकोटी येथे बाण मारुन ह्या पुलाचा भारतीय भूमीशी असलेला संबंध तोडला, अशी आख्यायिका आहे.

इसवी सन १९६४मध्ये झालेल्या वादळात धनुष्यकोटी हे गाव उध्वस्त झाले. ह्या भूतकालीन शहराला सध्या रेल्वेने जाण्याची सोय नसून टेम्पो जीपने रामेश्वरम पासून जाता येते.

संदर्भ :-

http://trifter.com/asia-pacific/rameshwaram-to-sri-lanka-a-bridge-built-by-gods-and-monkeys/#ixzz3gXY7Tim9

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

पद्मनाभस्वामी मंदिर (**ओवी क्रमांक** ३९) :-

पद्मनाभस्वामी मंदिराला थिरु अनंतपुरम् (थिरु म्हणजे श्री) Trivendram म्हणतात थिरुअनंतपुरम, केरळ येथे आहे. सरोवराकाठी असलेल्या पद्मनाभस्वामी मंदिराची वास्तू द्राविडियन पद्धतीची आहे. जगातील सर्वात श्रीमंत असलेले हे देवस्थान त्रावणकोर राजघराण्याचे कुलदैवत आहे. ह्या मंदिरात श्रीविष्णु भगवान आदिशेष नागराजावर पहुडलेले असून लक्ष्मी देवी त्यांच्या पायाशी बसलेली आहे.

संदर्भ :-

https://en.wikipedia.org/wiki/Padmanabhaswamy_Temple

---------------------------------------------------------

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

**नैमिष्यारण्य (ओवी क्रमांक** ३९) :-

निमिष अरण्य उत्तरप्रदेशातील लखनौपासून ९५ कि. मीटर अंतरावर आहे. निमिष अरण्य ह्या क्षेत्रास 'नैमिष्यारण्य तीर्थ' असे म्हणतात.

पुराणातील संदर्भानुसार ख्रिस्तपूर्व ३१०२ साली १७/१८ फेब्रुवारीच्या सुमारास श्रीकृष्ण अवतार समाप्ती झाल्यावर, द्वापारयुग संपून कलियुगास आरंभ झाला. कलियुग सुरु होण्यापूर्वी ३६ वर्षे आधी महाभारत युद्ध संपले.

संदर्भ : - https://en.wikipedia.org/wiki/Krishna

लवकरच कलियुग सुरु होणार असल्याने, शौनक इत्यादी ऋषी, मुनी ब्रह्मदेवाकडे गेले. त्यांनी ब्रह्मदेवाकडे कलिच्या प्रभावापासून दूर अशी जागा दाखविण्याची विनंति केली.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

ब्रह्मदेवाने एक चक्र जमिनीवर सोडले. "हे चक्र ज्या ठिकाणी थांबेल, ती जागा तपसाधनेस योग्य आहे", असे ब्रह्मदेवाने सांगितले.

ब्रह्मदेवाचे चक्र निमिष अरण्य (उत्तरप्रदेश) येथे थांबले. ऋषी, मुनिंसारख्या पुरुषोत्तम लोकांना ज्ञानसाधना करण्यास नैमिष्यारण्य मनोहर आहे, असे श्रीगुरुचरित्रकार सांगतात.

संदर्भ :- http://naimisharanyatirth.blogspot.in/

-----------------------------------------------------

बदरीतीर्थ (**ओवी क्रमांक** ४०) :-

बदरीतीर्थ उत्तराखंडातील चामोली जिल्ह्यात अलकनंदा नदीवर बदरीतीर्थक्षेत्र आहे. नर व नारायण ह्या गढवाल भागातील हिमालयपर्वत रांगांमध्ये बदरीक्षेत्र वसलेले आहे. ९व्या शतकात

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

आद्य शंकराचार्यांनी बदरी क्षेत्राची तीर्थक्षेत्र म्हणुन पुनःस्थापना केली.

संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Badrinath

कुरुक्षेत्र (**ओवी क्रमांक** ४०) :-

कुरुक्षेत्र हरयाणा राज्यात असून, ह्या क्षेत्रास धर्मक्षेत्र असे म्हणतात. राजा कुरुचा प्रदेश म्हणुन ह्यास कुरुक्षेत्र म्हणतात. महाभारत युद्ध कुरुक्षेत्रात झाले. श्रीकृष्णानी अर्जुनास गीता कुरुक्षेत्रात सांगितली.

संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Kurukshetra

कुरुक्षेत्र येथे प्राचीन स्थानेश्वर महादेव मंदिर असून ह्या भागात थानेसर असे म्हणतात. स्थानेश्वर मंदिराजवळ असलेले तळे पवित्र आहे, असे मानतात.

संदर्भ

https://en.wikipedia.org/wiki/Sthaneshwar_Mahadev_T

emple

केदारतीर्थ (गढवाल, हिमालय) **ओवी क्रमांक** ४२ :-

गढवाल, हिमालय पर्वतरांगा उत्तराखंड येथील केदारतीर्थ पांडवकाळापासून प्रसिद्ध आहे. श्रीशंकराला गढवालभागात बोली भाषेत केदार म्हणतात, म्हणून श्रीशंकराची पाचही स्थाने पंच केदार नावाने प्रसिद्ध आहेत.

ह्या पंच केदार तीर्थांपैकी

केदारनाथ हे १२ ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग असून हे मंदीर अक्षय्य तृतियेला उघडतात व दिवाळीतील भाऊबीजेस हे मंदीर हिमवर्षवामुळे बंद करतात.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

केदारनाथ हे मंदीर मंदाकिनी नदीच्या दोन प्रवाहांमधील जागेत आहे. येथील लिंग स्वयंभू असून त्याच्या तळाचा घेर १० ते १२ हात खोल ह्या लिंगाची उंची दोन हात आहे. पंचकेदारचे दर्शन घेतल्याशिवाय केदारनाथ यात्रेचे फळ मिळत नाही, अशी आख्यायिका आहे.

तुंगनाथ मंदीर हे तुंगनाथ हिमालय पर्वत रांगेवर असून जिल्हा रुद्रप्रयाग उत्तराखंड येथे आहे. हे मंदीर १००० वर्षे जुने आहे, असे समजले जाते. ह्या ठिकाणी १ फूट उंचीचे स्वयंभू शिव लिंग काळ्या दगडाचे असून किंचित डावी कडे झुकलेले आहे. हे लिंग श्रीशंकराचा हात ह्या स्वरुपात पूजले जाते. हिवाळ्यामध्ये हे मंदीर बंद असते. ह्या ठिकाणी आकाशकामिनी नदीचे तीन झरे हे पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

तुंग म्हणजे सगळ्यात उंच असलेले पंचकेदार मधील हे स्थान,हिरव्या गार समृद्धीने तसेच मोठ्या सदाहरित मोठ्या फूल झाडांनी यात्रेकरुंना नेत्रसुख देते.

मध्यमेश्वर मंदिर केदारनाथ रोडवर आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात हिमवर्षाव सुरु झाला की, हे मंदीर बंद करतात. थंडीच्या दिवसात हिमवर्षावामुळे ह्या मंदीरापर्यंत पोहोचणे अशक्य असल्याने, उन्हाळा सुरु झाल्यावर मध्यमेश्वर मंदीरापर्यंत पोहोचता येते. मध्यमेश्वर ठिकाणाभोवती चारमुखी (चार शिखरे) हिमालय पर्वतरांगा आहेत. केदार पर्वत रांगामधून मंदाकिनी नदी उगम पावते. केदार नाथ येथे दुर्मिळ वनस्पती व प्राणी आढळतात. कस्तुरी मृग ह्याच भागातील जंगलात आढळतात. केदारनाथ येथे श्रीशंकराची नाभी व उदर स्वरुपात पूजा होते.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

रुद्रनाथ येथे शिवमुख स्वरुपास महादेव म्हणतात. (नीलकांत कांत म्हणजे पति. जर पार्वतीचे नाव नील असेल तर शंकराला नीलकांत म्हणणे योग्य ठरेल. महादेवाचे एक नाव नीलकंठ आहे. )

ह्या ठिकाणी शिवमुखाची पूजा करण्याची प्रथा आहे. गढवाल हिमालय पर्वत रांगातील ह्या मंदिराजवळ सूर्य कुंड, चंद्र कुंड, तारा कुंड, मन कुंड अशी अनेक कुंडे आहेत. रुद्रनाथ येथून नंदा देवी, त्रिशुल नंदा, घुंटी ही हिमालयाची पर्वत शिखरे दिसतात. येथे वाहणाऱ्या रुद्रगंगा नदीला 'मोक्ष नदी' मानतात. ह्या ठिकाणी पिंडदान करण्याची प्रथा आहे. ह्या क्षेत्राला जाण्यासाठी डेहराडून हे जवळचे विमानतळ असून ऋषीकेश हे जवळचे रेल्वे स्टेशन आहे. गोपेश्वर ठिकाणाहून हिमालय चढत रुद्रनाथ येथे जाता येते. हा मार्ग पाचही केदार तीर्थातील अवघड मार्ग आहे.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

रुद्रनाथ तीर्थाचे दर्शन घेतल्यावर कपालेश्वर मंदीर दर्शनाची प्रथा आहे.

कपालेश्वर हे तीर्थ हिमालय पर्वत रांगामधील दुर्गम दरीतील घनदाट जंगलात असून येथे श्रीशंकराची जटेश्वर स्वरुपात पूजा होते. दुर्गम दरीतून कल्प गंगा ही अलकनंदा नदीची उपनदी वहाते. ह्याठिकाणी ऋषीकेश- बद्रीनाथ मार्गाने जाता येते.

संदर्भ :-https://en.wikipedia.org/wiki/Panch_Kedar

---------------------------------------------

कोटिरुद्र नर्मदातीर्थ (**ओवी क्रमांक** ४२):-

नर्मदानदी मध्यप्रदेशातील महिकाल पर्वतावरील अमरकंटक येथे उगम पावते. गंगा नदीपेक्षा १६०दश लक्ष वर्षे जुनी असलेल्या नर्मदा नदीचा वेदिक साहित्यात उल्लेख सापडत नाही. तज्ञ लोकांच्या मते, वेदिक साहित्यात उल्लेख केलेली रेवा नदी हीच

नर्मदा नदी होय. वाल्मिकी रामायणात नर्मदा नदीचा उल्लेख नर्मदा नावाने आहे. कालिदासाच्या रघुवंशामध्ये नर्मदा नदीचा उल्लेख आहे. मत्स्यपुराण, कूर्मपुराण पुराणांमधील उल्लेखानुसार नर्मदा नदी १०० योजने लांब आणि २ योजने रुंद असून ह्या नदीवर ६०००६०००० (६०कोटी६०हजार तीर्थ) आहेत.

६०कोटी६०हजार तीर्थांमध्ये एक भैरव तीर्थ व एक विष्णु तीर्थ असून बाकी सर्व तीर्थे शिवाची म्हणजे रुद्राची असल्याने नर्मदा नदीस श्रीगुरुचरित्रकार कोटीरुद्र तीर्थ नर्मदातीर्थ असे म्हणतात.

संदर्भ :- Narmadlpradaksin˜l

Circumambulation of the Narmada˜ river

D I S S E R T A T I O Nzur Erlangung des Grades*doctor philosophiae* (Dr. phil.)vorgelegt von Ju¨rgen Neua¯

am Institut fu¨r die Sprachen und Kulturen Su¨dasiens

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

im Fachbereich Geschichts- und Kulturwissenschaften

der Freien Universität Berlin

-----------------------------------------------------

मातृकेश्वर कुब्जतीर्थ (ऋषीकेश, उत्तराखंड) (**ओवी क्रमांक** ४२):-

कुब्जतीर्थ हे ऋषीकेश येथे आहे. ब्रह्मदेवाच्या वरानी उन्मत्त होऊन त्रासदायक झालेल्या मधु आणि कैताभ ह्या राक्षस बंधुंचा श्रीविष्णुनी नाश केला. पृथ्वीवरील मोठे संकट दूर केल्यावर, श्रीविष्णुनी आजूबाजूला पाहिले. तेव्हा श्रीविष्णुस रौम्य मुनी हात वर करुन एकाग्र चित्ताने ध्यान करताना दिसले. १०००वर्षे अशाप्रकारे तप करणाऱ्या रौम्य ऋषीवर श्रीविष्णु प्रसन्न झाले. श्रीरौम्य मुनीकडे पहात असताना, श्रीविष्णुने आंब्याच्या झाडाच्या

फांदीवर हात ठेवला. श्रीविष्णुच्या हाताच्या वजनाने आंब्याच्या झाडाची फांदी वाकली, म्हणून ह्या क्षेत्राला कुब्जाम्रक नाव पडले.

कुब्जाम्रक = कुब्ज (वाकडे) + आम्रक (आंब्याचे झाड)

रौम्य ऋषींनी श्रीविष्णुला साष्टांग नमस्कार घालून "ऋषीकेश हे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होऊ दे," अशी विनंति केली. प्रसन्न झालेल्या विष्णुच्या वरामुळे येथील तीर्थात स्नान केल्याने, पुढील जन्मी मोठे कुटुंब, पैसा, नावलौकिक मिळतो, अशी लोकांची श्रद्धा आहे.

असे हे कुब्जतीर्थाचे महात्म्य वराह विष्णुनी भूदेवीला सांगितल्याने ह्या क्षेत्राला

मातृकेश्वर =मातृक (आईसंबधीचे) + ईश्वर

म्हणजे आई भूदेवी व ईश्वर (श्रीविष्णु) यांच्या संवादातून समजलेले कुब्जतीर्थाचे महात्म्य होय.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

संदर्भ :-

https://en.wikipedia.org/wiki/Rishikesh

-------------------------------------------------

कोकामुख बराह क्षेत्र, नेपाळ (**ओवी क्रमांक** ४२):-

कोका नदीचे सप्तकोशी नदीला मिळणारे मुख नेपाळमध्ये आहे. ह्या क्षेत्राला 'वराह क्षेत्र' असे नाव असून बोली भाषेत हे नाव 'बराह क्षेत्र' असे झालेले आहे. हे स्थान नेपाळ मधील पूर्व दिशेला असलेल्या धरण गावापासून २० कि. मीटरवर आहे. ह्या ठिकाणी श्रीविष्णुने वराह अवतारात हिरण्यकश्यप राक्षसाला ठार केले, अशी आख्यायिका आहे. कोका नदीचे मुख नेपाळमध्ये असल्याने कोकामुखी तीर्थ नेपाळ येथे असावे.

नेपाळमध्ये सप्तकोशी नदीला सूनी कोशी म्हणजे स्वर्ण कोशी म्हणतात.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

तिबेटमध्ये उगम पावणाऱ्या कोशी नदीला कांचनगंगा येथे उगम पावणारी तमूर कोशी तसेच तिबेटमध्ये उगम पावणारी अरुण नदी मिळते. पुढे ह्या नदीला धूध कोशी, भुते कोशी, तांबा कोशी, इंद्रावती कोशी अशा सात उपनद्या मिळून ही नदी सप्तकोशी होते. बिहारमध्ये सप्तकोशी नदीचा कतिहार जिल्ह्यात कुसरेला येथे गंगा नदीशी संगम होतो.

संदर्भ :

http://travelagencynepal.com/pilgrimagesitesinnepal

---------------------------------------------------

गोकर्ण (**ओवी क्रमांक** ४३) :-

गोकर्ण क्षेत्र कर्नाटकातील उत्तर कन्नडा जिल्ह्यात, पश्चिम किनारपट्टीवर अरबी समुद्रालगत आहे. गोकर्ण क्षेत्री शिवशंकराचे आत्मलिंग असून, अनेक शिव मंदिरे आहेत. गोकर्ण

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

पुराणातील रावणाच्या शिवभक्तीची कथा श्रीगुरुचरित्रकारांनी श्रीगुरुचरित्र अध्याय ६ मध्ये सांगितलेली आहे.

संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Gokarna,_India

-------------------------------------------

शबलग्राम (**ओवी क्रमांक** ४४) :-

हिमालय पर्वतरांगामधील काळी गंडकी नदी काठी शबलग्राम येथे शाळिग्राम हे जीवाश्म मिळतात. आद्य शंकराचार्यांनी शाळिग्राम हे श्रीविष्णुचे रुप मानले आहे. असे विष्णु स्वरुप मिळणारे शबलग्राम हे मुक्तिक्षेत्र आहे

संदर्भ :- https://en.wikipedia.org/wiki/Shaligram

-----------------------------------------------

भीमेश्वर तीर्थ, गोदावरी नदी (**ओवी क्रमांक** ४७) :-

देवांचा प्रबल शत्रू असलेल्या विश्वरुप नावाच्या असूराने गौतमी तीरावर इतर ऋषींबरोबर तपश्चर्या सुरु केली.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

विश्वरुप राक्षस त्याच्या तामस स्वभावाने तपस्या करीत असल्याने, इतर ऋषींनी त्याला विरोध केला. परंतु विश्वरुप राक्षसाने त्यांचे न ऐकता भयंकर कुंड तयार केले. त्या कुंडात भयानक अग्निदेवता प्रज्वलित करुन, तो आत्मरुपाने भयानक रौद्रस्वरुपाचे चिंतन करायला लागला.

विस्वरुप राक्षस हा स्वतः महाभीम (भीम= भयंकर) म्हणजे महा भयंकर होता. त्याचे कर्म, त्याची आकृती भयंकर होती. त्याच्या हृदयातला भाव भयंकर होता. त्याने भगवान रुद्राचे ध्यान करुन यज्ञकुंडात स्वतःची आहुती दिली. तेव्हापासून महा भीम (खूप भयंकर राक्षसाने) आराधलेल्या भगवान शंकराला भीमेश्वर म्हणतात व गौतमी तीरावरील तीर्थास भीमेश्वर तीर्थ असे म्हणतात. अशा ह्या भीमेश्वर तीर्थाच्या ठिकाणी स्नान करणारा व

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

दान देणाऱ्यास निश्चित मोक्ष मिळतो असे ब्रह्म पुराणात सांगितलेले आहे.

गोदावरी ही नदी गौतमी, नीलावेरु, वशिष्ठ व वैनतेय अशा नद्यांद्वारे बंगालच्या उपसागराला काकिनाडा, आंध्रप्रदेश येथे मिळते. ह्या प्रदेशात भीमेश्वर तीर्थ असावे. (निश्चित संदर्भ उपलब्ध नाही).

| |
|---|
| संदर्भ<br>http://www.vedpuran.com/brahma.asp?bookid=2&secid=1&pageno=001&Ved=Y&PuranName=Brahma |
| (Please see page NO.258) |

-------------------------------------------

वंजरासंगम, गोदावरी नदी (**ओवी क्रमांक** ४७) :-

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

कांडकुर्ती, बोधन तालुका आंध्रपदेश महाराष्ट्र व आंध्र प्रदेश सीमावर्ती भाग येथे गोदावरी वंजरा (हल्ली ह्या नदीला मंजिरा म्हणतात) व हरिद्रा ह्या नद्यांचा संगम आहे वंजरा संगम ह्या संगमाचे वर्णन ब्रह्म पुराण अध्याय १५९ वंजरासंगमतीर्थवर्णम् ह्या अध्यायात ब्रह्माने सांगितलेले आहे, "वंजरा संगमासारखे तीर्थ आढळत नाही."

संदर्भ :-

http://samvada.org/2012/news/remembering-rss-founder-dr-kb-hedgewar-on-his-123th-birthday-on-yugadi/ (Short URL: http://samvada.org/?p=9045 )

Remembering RSS Founder Dr KB Hedgewar on his 123th Birthday on Yugadi मध्ये खालील परिच्छेदात वंजरा व हरिद्रा व गोदावरी अशा त्रिवेणी संगमाचा उल्लेख आहे :-

The hedgewar family originally hailed from Kandkurti village in telangana- a village with a population of just

over two thousand. Kandkurti is in the Bodhana tehsil in the Indore (Nizamabad) district, situated on the border between Andhra and Maharashtra. Near the village is the sacred confluence of Godavari, Vanjra and Haridra rivers. The hallowed Vanjra confluence finds mention even in the puranas. As if reflecting this sangam, one finds in this area a delightful admixture of three languages-Kannada, Telugu and Marathi.

## कुशतर्पण तीर्थ(ब्रह्मगिरी पर्वत व भोवतालचा प्रदेश)

**ओवी क्रमांक** ४८ :-

पुराणातील वर्णनानुसार, ब्रह्मदेवानी सृष्टी निर्माण करताना केलेले यज्ञाचे स्थान ब्रह्मगिरी नावाने प्रसिद्ध झाले. हा यज्ञ करताना वसंत ऋतुचे तुप, ग्रीष्मचे ऋतुचे इंधन, शरद ऋतुचे हविष्य (आहुतिद्रव्य) व वर्षा ऋतुला कुशामध्ये ब्रह्माने स्थान दिले. ह्या यज्ञात सृष्टी निर्माण झाल्यावर प्रणिपात्रातील जलातून प्रणिता

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

नदी निर्माण झाली कुशांनी मार्जन करीत प्रणिता नदीचे ब्रह्मदेवाने विसर्जन केले. ह्या प्रणिता नदीच्या थेंबातून तीर्थे निर्माण झाली संमार्जन करताना ज्या ठिकाणी कुश पृथ्वीवर पडले, तिथे कुश तर्पण तीर्थ निर्माण झाले.

संदर्भ :-

http://shodhganga.inflibnet.ac.in:8080/jspui/bitstream/10603/34388/9/09_chapter%203.pdf

दखखनचे पठार निर्माण करणाऱ्या ज्वालामुखीस

सृष्टी निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाचा यज्ञ हे पुराणातील वर्णन समर्पक आहे. पुराणातील वर्णनानुसार ब्रह्मदेवाने वर्षाऋतू कुशात ठेवला ब्रह्मगिरीपर्वत शिखरावर पसरलेल्या लाव्हारसात पावसाचे पाणी धरुन ठेवण्याची क्षमता आहे ह्या लाव्हारसाच्या ब्रह्मगिरी पर्वतावरील थरात गोदावरी व वैतरणा ह्या दोन नद्यांचा उगम होतो.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

भूगर्भशास्त्र नोंदीनुसार सुमारे ६० ते ६६ दशलक्ष वर्षांपूर्वी झालेल्या ज्वालामुखीतून ब्रह्मगिरी पर्वत झाला असावा. ह्या ज्वालामुखीतून दख्खनचे पठार निर्माण झाले असावे.

दख्खनच्या पठारातील मध्यप्रदेशाची निर्मिती प्रथम होऊन नंतर महाराष्ट्र निर्मिती झालेली असावी, असे भूगर्भशास्त्राचे अनुमान आहे .

संदर्भ :-
https://en.wikipedia.org/wiki/Deccan_Plateau

गोदावरी समुद्र संगम (काकीनाडा,आंध्र प्रदेश)

**ओवी क्रमांक** ४८ :-

पुराणकाळी गोदावरी नदी सात धारांनी बंगालच्या उपसागराला मिळत असावी. ब्रह्मपुराणात गोदावरीच्या सप्त धारांची नावे ही सात ऋषींची नावे असून पुढीलप्रमाणे आहेत १) दक्षिण धारा वशिष्ठी, २)उत्तर धारा वैश्वामित्री, ३) ह्या वैश्वामित्री

धारेच्या उत्तरेला असलेली वामदेवी, ४) मधली गौतमी, ५)गौतमीच्या उत्तरेला भारद्वाजी, ६)भारद्वाजीच्या उत्तरेला अत्रेयी, ७) शेवटची धारा जमदग्नी ही पुराणकालीन नावे आहेत.

संदर्भ :-

http://www.vedpuran.com/brahma.asp?bookid=2&secid=1&pageno=001&Ved=Y&PuranName=Brahma

हल्ली गोदावरी नदीला चार मुख आहेत :-

राजमहेन्द्री, आंध्रप्रदेश इथे गोदावरी नदी दोन नद्यांमध्ये दुभागते.

१) वृद्ध गौतमी गोदावरी व २) वशिष्ठ गोदावरी.

१) वृद्ध गौतमी गोदावरी नदी दोन नद्यांमध्ये दुभागते.

१) गौतमी, २) निलावेरु

२) वशिष्ठ गोदावरी नदी २ नद्यांमध्ये दुभागते.

१) वशिष्ठ २) वैनतेय

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

**काळाच्या ओघात गोदावरी नदीची ३ मुखे लुप्त झालेली असून सात मुखांपैकी फक्त ४ मुखे सध्या अस्तित्वात राहिलेली आहेत.**

**गोदावरी नदी गौतमी, नीलावेरु, वशिष्ठ व वैनतेय अशा नद्यांद्वारे बंगालच्या उपसागराला काकिनाडा आंध्रप्रदेश येथे मिळते.**

संदर्भ :-

https://en.wikipedia.org/wiki/Godavari_River

---------------------------------------------------

## पूर्णा (अर्वाचीन नाव पेरियार नदी) कालाडी, केरळ

(**ओवी क्रमांक** ४९) :-

पूर्णा नदीचे आजचे नाव पेरियार नदी असून ह्या नदीस केरळची जीवनरेखा म्हणतात. पेरियार म्हणजे मोठी ही केरळमधील मोठी नदी असून शिवमाला येथील सुंदरगिरी

डोंगरावर उगम पावते. ह्या नदीची लांबी २४४ कि. मीटर असून तिचे मुख लक्षद्विप सागर तसेच वेम्बानंद सरोवर ह्या ठिकाणी आहे. ह्या नदीच्या काठी असलेले कालाडी गाव ही आद्य शंकराचार्यांची जन्मभूमी आहे.

शंकराचार्यांच्या आईला रोज ३ कि. मीटरवर असलेल्या पेरियार नदीवर स्नानासाठी जावे लागयचे. शंकराचार्यांना बालपणी ह्या गोष्टीची खंत वाटायची. आपण आपल्या आईसाठी काहीच करु शकत नाही. ह्या गोष्टीने बाल शंकराच्या डोळ्यात अश्रू दाटून यायचे. बाल शंकराने श्रीकृष्णाची प्रार्थना केली. श्रीकृष्णाने बाल शंकराला दृष्टांत देऊन सांगितले, “तुझ्या छोट्या पावलांच्या मार्गावर पूर्णा नदी आपला प्रवाह बदलून येईल” ह्या आख्यायिकेनुसार पेरियार तत्कालिन नाव पूर्णा

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

नदीने प्रवाहाचा आपला मार्ग बदलून बाल शंकराच्या घरासमोरील परसबागेतून वाहू लागली.

ह्या आख्यायिकेनुसार ससालम ह्या गावाचे नाव कालाडी (८व्या शतकाच्या अखेरीस व ९व्या शतकाच्या सुरवातीस ७८८ ते ८२०)झाले. मल्याळम भाषेत कालाडी म्हणजे पाऊल खुणा टाक म्हणजे ठसा आद्य शंकराचार्यांच्या पावलाचा ठसा असलेली पुर्णा नदी म्हणजे आजची पेरियार नदी केरळ होय. केरळ मधील 'शिवगुरु व अरि अंबा' ह्या नंबुद्री ब्राह्मण दांपत्याचा मुलगा शंकर पुढे आसेतू हिमाचल भारतवर्षात हिंदू धर्माची प्रतिष्ठापना करणारे आद्य शंकराचार्य झाले.

संदर्भ :-

https://en.wikipedia.org/wiki/Periyar_(river)

https://en.wikipedia.org/wiki/Kalady

---

कृष्णा नदी (**ओवी क्रमांक** ४९) :-

कृष्णा नदी ही १३०० कि. मीटर लांब नदी असून गंगा, गोदावरी, नर्मदा ह्या नद्यांनंतर चौथ्या क्रमांकाची भारतातील लांब नदी आहे. ह्या नदीला कृष्णावेणी हे नाव आहे. महाबळेश्वर जवळच्या जोर गावात सातारा जिल्हा महाराष्ट्र येथे कृष्णा नदी उगम पावते. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेशातून वाहणारी कृष्णा नदी शेवटी बंगालच्या उपसागराला हमसालदिवी (जिल्हा कृष्णा), आंध्रप्रदेश येथे मिळते.

संदर्भ :-

https://en.wikipedia.org/wiki/Krishna_River

http://hinduonline.co/Scriptures/Puranas/BhavishyaPurana.html

---------------------------------------------------------------

तुंगभद्रा नदी (**ओवी क्रमांक** ५०):-

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

तुंगभद्रा नदीचा उगम कुडी भद्रावती कर्नाटक येथे तुंगा व भद्र ह्या दोन नद्यांच्या संगमातून होतो. तुंगा नदी गंगामूला (जिल्हा चिकमंगळूर) कर्नाटक येथे वराह पर्वतात उगम पावते. १४७ कि. मीटर लांब असलेली तुंगा नदी चिकमंगळूर व शिमोगा ह्या दोन जिल्ह्यातून वहाते. ह्या नदी काठावर श्रीशंकराचार्यांचा शृंगेरी मठ आहे. तुंगा नदी शिमोगा गावाजवळील कुडी ह्या ठिकाणी भद्रा नदीस मिळते.

ह्या नदीविषयी प्राचीन म्हण आहे **तुंगा पान गंगा स्नान** म्हणजे तुंगा नदीचे पाणी प्यावे आणि गंगेत स्नान करावे.

ह्या संगमातून तयार होणारी तुंगभद्रा नदी कृष्णा नदीची उपनदी आहे.

संदर्भ :-

https://en.wikipedia.org/wiki/Tunga_River

https://en.wikipedia.org/wiki/Bhadra_River

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

https://en.wikipedia.org/wiki/Tungabhadra_River

---------------------------------------------------

पंपा सरोवर (**ओवी क्रमांक** ५०):-

रामायण काळात तुंगभद्रा नदीला पंपा नदी म्हणत असत.

जिल्हा कुप्पल, कर्नाटक येथे हंपी जवळ पंपासरोवर आहे.

प्राचीनकाळापासून पवित्र मानलेल्या ह्या सरोवराकाठी देवी पार्वतीने पम्पा रुपात शिवशंकराची भक्ती केली होती. तसेच रामायण काळातील रामभक्त शबरी ही पंपा सरोवर काठी वास्तव्यास होती. पंपासरोवर काठी शबरीला रामाचे दर्शन झाले.

महर्षी व्यासांनी रचलेल्या श्रीमद् भागवतम् ह्या ग्रंथावरील भाष्य वल्लभाचार्यांनी लिहिले.मध्ययुगातील भक्ती मार्गांचे जनक असलेले वल्लभाचार्य १४७९ ते १५३१ ह्यांनी पंपासरोवर परिसरात भक्ती मार्ग जगाला दाखविला.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

शिवभक्त पार्वती, रामभक्त शबरी तसेच विष्णुभक्त वल्लभाचार्य यांच्या वास्तव्यामुळे भक्ती प्रणित झालेले पंपासरोवर भक्तीमार्ग शिकविते.

संदर्भ :-

https://en.wikipedia.org/wiki/Pampa_Sarovar

http://hampi.in/mythology-of-hampi

हरिहर (कर्नाटक) **ओवी क्रमांक** ५१:-

हरिहर क्षेत्र कर्नाटकात असून शिव व विष्णु यांच्या संयुक्त रुपातून हरिहर अवतार झाल्याची आख्यायिका आहे. हरिहर क्षेत्र येथील हरिहर मंदिरात हरिहराची मूर्ती आहे. ह्या मूर्तीचा डावा भाग हरिचा (श्रीविष्णु) असून उजवा भाग हराचा (श्रीशंकर) आहे.हे ठिकाण जिल्हा शिमोगा, कर्नाटक येथे असून मंदिरा जवळून तुंगभद्रा नदी वाहते.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

ह्या क्षेत्राचे प्राचीन नाव *गुहारण्य* असून, येथे रहाणाऱ्या गुहासूर राक्षसाने ब्रह्मदेवाला प्रसन्न केले. प्रसन्न झालेल्या ब्रह्मदेवाने गुहासूराला वर दिला की, “श्रीविष्णु व श्रीशंकर एकेकटे (त्याचा) गुहासूराचा वध करु शकणार नाहीत.” ब्रह्मदेवाच्या वराने उन्मत गुहासूराच्या त्रासाने देव, ऋषी, मुनी मनुष्य सगळे त्रस्त झाले. तेव्हा शिव व विष्णु यांनी एकत्रित रुपात पृथ्वीवर अवतार घेऊन गुहासूराचा वध केला, अशी आख्यायिका आहे.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Harihareshwara_Temple

-----------------------------------------------

भीमरथी (भीमा नदी) **ओवी क्रमांक** ५१:-

कुंभकर्णाचा पुत्र भीम सह्याद्री पर्वतरांगामध्ये आपली आई करकाटी बरोबर रहात होता. ह्या भीमासूराला त्याच्या

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

आईकडून समजले की, श्रीविष्णुच्या राम ह्या अवताराने त्याच्या वडिलांना (कुंभकर्णास) राम-रावण युद्धात ठार मारले. ही घटना समजल्यावर भीमासूराने ब्रह्मदेवास प्रसन्न केले. ब्रह्मदेवाच्या वराने उन्मत्त झालेल्या भीमासूराने देव, ऋषी,मुनी, मनुष्य सर्वांना त्रस्त केले. शिवशंकराने भीमासूराशी घनघोर युद्ध करुन भीमासूरास ठार मारले. ह्या युद्धात शिवशंकरास आलेल्या घामातून भीमा नदी निर्माण झाली, अशी आख्यायिका आहे. ह्या आख्यायिकेतून भीमा नदीचे नाव भीमरथी झाले.

भीमाशंकर ज्योर्तिलिंग मंदिराच्या मागील बाजूस पुरुषभर उंचीचे पाषाणाचे कुंड आहे. ह्या कुंडातून भीमा नदीचा उगम होतो. ही भीमा नदी रायचूर, कर्नाटक येथे कृष्णा नदीस येऊन मिळते. भीमाशंकर हे ज्योर्तिलिंग पुण्यापासून सुमारे १२७कि. मीटर अंतरावरील तालुका खेड येथे आहे.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Bhimashankar_Temple

-------------------------------------------------------

**गाणगापूर (ओवी क्रमांक** ५२ ते ५९) :-

गाणगापूर हे स्थान पुणे-रायचूर लोहमार्गावर (गाणगापूर रेल्वेस्टेशनपासून चौदा मैलांवर) भीमा-अमरजा नद्यांच्या संगमावर आहे. श्रीनृसिंह सरस्वती येथे वाडीहून आले आणि सुमारें तेवीस वर्षें येथें राहून नंतर श्रीशैल्य पर्वताकडे गेले. त्यांच्या दोन तपाएवढ्या प्रदीर्घ सान्निध्यामुळे हे स्थान दत्त उपासनेच्या क्षेत्रात प्रसिद्धीस आले.

श्रीगुरु जेव्हां येथे आले, तेव्हा प्रथम ते संगमरावर राहिले, नंतर ते गांवांत बांधलेल्या मठात राहू लागले. या मठाच्या स्थानी त्यांच्या पादुका आहेत.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

संदर्भ :

http://dattatraymahadevmandir.webs.com/shreedattatraykatha

---

**गलगनाथ संगमस्थान** (ओवी क्रमांक ६०):-

गलगनाथ जिल्हा हवेरी कर्नाटक येथे तुंगभद्रा व वरदा ह्या नद्यांचा संगम होतो. गलगनाथ संगमस्थानी ११ शतकातील गलगेश्वर शिव लिंग मंदिर आहे. हे शिव लिंग खूप मोठे असून ह्या लिंगास 'स्पर्श लिंग' असे म्हणतात. ह्या मंदिरात शंकूच्या आकाराचे तळघर आहे. ह्या मंदिराच्या भिंतींवर कन्नड भाषेत शिलालेख लिहिलेला आहे.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Galaganatha#cite_note-3

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

---

कुडाळ संगम (ओवी क्रमांक ६०,८४):-

कुडाळसंगम हे स्थान लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान आहे. कर्नाटक राज्यातील अलमट्टी धरणापासून सुमारे १५ कि. मीटर अंतरावर कृष्णा व मलप्रभा नद्यांच्या संगम होतो. कुडाळसंगम स्थानानंतर कृष्णा नदी पूर्व दिशेला श्री शैल्य पर्वताकडे वहात जाते. कुडाळ संगम स्थानी असलेले शिवलिंग स्वयंभू आहे अशी लोकांची श्रद्धा आहे.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Kudalasangama

कुडाळ संगमस्थानी लिंगायत समाजाचे संस्थापक श्रीबसवण्णा यांची समाधी आहे. श्रीबसवण्णा यांना श्रीगुरुचरित्रकार तपोनिधी संबोधतात.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

१२ शतकात कुडाळ संगमस्थानी लहानाचे मोठे झालेले श्रीबसवा हे समाजसुधारक, तत्वज्ञानी, मुसद्दी तसेच कवी मनाचे होते. श्रीबसवा यांनी कर्नाटकातील भक्तीसंप्रदायाची सुरवात केली.

लिंगभेद ,जातीय तसेच सामाजिक भेद्भाव यांना श्रीबसवा यांच्या तत्वप्रणालित स्थान नव्हते. श्रीबसवा यांनी त्यांच्या काव्यातून जगाला सांगितले, "जीवनात कार्य हाच कैलास आहे तसेच जीवनातील कार्य हीच उपासना आहे".(Work is worship)

जीवनातील स्थावर व जंगम हा भेद सांगताना श्रीबसवण्णा पुढील काव्यात सांगतात,

श्रीमंत व्यक्ती मंदिर बांधेल

मी गरीब माणूस काय करु शकणार ?

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

माझे पाय हेच मंदिराचे खांब आहेत

माझे शरीर ही पवित्र जागा आहे

माझे डोके हे त्यावरील सोन्याचे छप्पर आहे

हे नदी संगमीच्या देवा, ऐक

एका जागी उभ्या असलेल्या गोष्टी पडू शकतात !

परंतू जंगम गोष्टी टिकतात.

(मनुष्य देहाला मंदिर मानून त्या देहाला सतत जीवन प्रवाहात वाटचाल करायला सांगणारी, अप्रतिम काव्य रचना श्रीबसवण्णा यांनी केलेली दिसते.)

थोडक्यात थांबला (स्थिरावला) तो संपला !)

| संदर्भ : https://en.wikipedia.org/wiki/Basava |
| --- |

---

निवृत्तिसंगम (कर्नुल,आंध्र प्रदेश) (**ओवी क्रमांक** ६१) :-

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

आंध्र प्रदेश मधील कर्नुल जिल्ह्यातील मुचुमारी गावाजवळ असलेल्या भूतकालीन संगमास निवृत्तिसंगम असे नाव होते. भावनासी,कृष्णा वेणी, तुंगभद्रा, भीमरथी (भीमा नदी), मलपहारिनी (मलप्रभा) ह्या नद्यांच्या संगमास निवृत्तिसंगम असे नाव होते. ऐतिहासिक नोंदीनुसार शिवाजी महाराजांनी मार्च १६७७ मध्ये निवृत्तिसंगमास भेट दिली होती.

निवृत्तिसंगमावरील संगमेश्वर मंदिरातील लाकडी शिवलिंगाची प्रतिष्ठापना धर्मराजाने केली होती, अशी आख्यायिका आहे.

१९८१साली श्रीशैल्यम धरण झाल्यावर निवृत्तिसंगम ठिकाण पाण्यात लुप्त होण्यास सुरवात झाली. श्रीशैल्यम धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संगमेश्वर मंदिर कायमस्वरुपी लुप्त होईल, अशी शंका हिंदू ह्या वृत्तपत्रात दि. २६

डिसेंबर २००४ मध्ये लेखक श्री. डी. शिरिनिवासुलु व्यक्त केलेली आढळते.

| |
|---|
| संदर्भ : https://en.wikipedia.org/wiki/Sangameswara_Temple,_Kurnool http://www.thehindu.com/2004/12/26/stories/2004122600731100.htm |

--------------------------------------------------------------------

पाताळगंगा (**ओवी क्रमांक** ६७) :-

पुराणांत तीन प्रकारच्या गंगा नदींचा उल्लेख आढळतो. १)स्वर्गगंगा (मंदाकिनी नदी), २) भू गंगा (भागीरथी), ३)पाताळगंगा (भागवती) ह्या तीन प्रकारच्या गंगेच्या उपनद्या व

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

इतर उपनद्या यांच्या संगमातून निर्माण होणारी गंगा नदी बंगालच्या उपसागराला मिळते.

महाभारतात अर्जुनाने जमिनीत बाण मारुन पाताळगंगेचा झरा भीष्माचार्यांसाठी निर्माण केला होता, असा उल्लेख आहे.

ओरिसा राज्यातील 'भवानीपटना' ह्या स्थानाजवळ असणारे गरम पाण्याचे झरे म्हणजे पाताळगंगा अशी स्थानिक लोकांची श्रद्धा आहे.

महाराष्ट्रातील खंडाळा येथे उगम पावणारी पाताळगंगा नावाची नदी खोपोली कर्जत मार्गे धरमतर खाडीत अंबा नदीशी संगम करते.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Patalganga_River

https://en.wikipedia.org/wiki/Bhawanipatna

---

**कावेरी नदी (ओवी क्रमांक** ६८ ) :-

कावेरी नदी तालकावेरी कोडागु (सह्याद्री पर्वत रांगामधील पश्चिम घाट) कर्नाटक येथे उगम पावते. मंड्या जिल्ह्यातील श्रीरंगपटनम् हे बेट कावेरी नदीचा पश्चिम वाहिनी प्रवाह व मूळ प्रवाह यांनी वेढलेले आहे. ह्या दोन्ही प्रवाहांचा संगम श्रीरंगपट्टनम् येथे होतो.

तंजावर जवळ कावेरी नदी अनेक मुखांनी बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Kaveri\

---

**ताम्रपर्णी नदी (ओवी क्रमांक** ६९) :-

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

ताम्रपर्णी नदीचे आजचे नाव तामिरबरानी नदी असे आहे. ही नदी तामीळनाडूतील अगस्त्यरकूडम ह्या शिखरावर उगम पावते. ही नदी तिरुनवेली टुटीकोरीन जिल्ह्यातून वहाते. १२५ कि .मीटर लांबीची ही नदी हिंदी महासागरातील मन्नारचे आखात येथे समुद्राला मिळते. मन्नारचे आखात नैसर्गिक मोती निर्मितीसाठी जगात प्रसिद्ध आहे.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Thamirabarani_River

https://en.wikipedia.org/wiki/Gulf_of_Mannar

---

कृतमाला नदी **(ओवी क्रमांक** ६९) :-

कृतमाला नदीचे हल्लीचे नाव वैगई नदी असावे.

**अध्याय** पंधरावा                    तीर्थयात्रानिरुपण

संदर्भ :

https://groups.yahoo.com/neo/groups/SriRangaSri/conversations/topics/13431

ह्या संदर्भात कृतमाला नदी म्हणजे हल्लीची वैगई नदी असा पुढील उल्लेख आढळतो,

Satyavrata was standing in the river Krutamala (also known as Vaigai in modern times, the city of Madurai is located on the shores of the Vaigai river) and offering jala tharpana

ही नदी वरुसनाडू खोऱ्यात (जिल्हा थेनी, तामीळनाडू) येथे उगम पावते. मदूराई येथून वहाणाऱ्या ह्या नदीची लांबी २५८ कि. मीटर असून ही नदी हिंदी महासागरास पाल्क स्ट्रेट येथे मिळते.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Vaigai_River

http://bhajagovindham.blogspot.in/2013/03/understanding-sri-vaishnavism.html

---------------------------------------------------------------

**पयस्विनी नदी** (**ओवी क्रमांक** ७०) :-

पयस्विनी नदीला चंद्रगिरी नदी असे नाव आहे. ही नदी कर्नाटकातील कोइनाडू, जिल्हा कोडागू येथे उगम पावते. दक्षिण कन्नड जिल्हा येथून ही नदी वहात जाऊन केरळमधील कासारगुड अरबी समुद्राला ही नदी मिळते.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Payaswini

**भवनाशिनी नदी= सरयू नदी** (**ओवी क्रमांक** ७०) :-

**अध्याय** पंधरावा                    तीर्थयात्रानिरुपण

सरयू नदी कर्नाली घागरा आणि महाकाली शारदा ह्या नद्यांच्या संगमातून सरयू नदी बहराइच, उत्तरप्रदेश येथे निर्माण होते. ही नदी उत्तरप्रदेश व उत्तराखंड ह्या प्रदेशातून वहाते. ह्या नदीच्या काठी रामायणातील अयोध्या नगरी वसलेली होती.

काही नकाशा निर्माणकर्त्यांच्या मते, घागरा नदीच्या अयोध्या नगरी जवळील भागास सरयू नदी म्हणतात. घागरा नदी तिबेटमधील मानस सरोवराजवळ उगम पावते. ह्या नदीस कर्नाली नदी असेही नाव आहे. ही नदी नेपाळ मधील हिमालय ओलांडून आल्यावर ह्या नदीचा भारतात ब्रह्मघाट येथे शारदा नदीशी संगम होतो. ह्या संगमानंतर घागरा नावाने वहाणारी ही नदी बिहारमधील दोरिगंज येथे गंगा नदीशी संगमित होते. गंगा

नदीची दोन क्रमांकाची असणारी ही उपनदी १०८० कि. मीटर लांब आहे.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Sarayu

https://en.wikipedia.org/wiki/Ghaghara

-----------------------------------------------------------

शेषाद्रिक्षेत्र (**ओवी क्रमांक** ७१):-

चित्तूर जिल्ह्यातील (आंध्र प्रदेश), तिरुपती येथील तिरुमला डोंगराळ गावात वसलेले श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिर एक वैष्णव मंदिर आहे. प्रभु वेंकटेश्वर, हा विष्णूचा अवतार, आहे. हे मंदिर तिरुमला मंदिर, तिरुपती मंदिर, तिरुपती बालाजी मंदिर सारख्या इतर नावे ओळखले जाते.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

शेषाचलम हिल्सला नीलाद्री, गरुडाद्री, अंजनाद्री, वृषभाद्री, नारायणाद्री, शेषाद्री आणि वेंकटाद्री अशी सात शिखरे आहेत.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Natural_Arch,_Tirumala_hills

https://en.wikipedia.org/wiki/Seshachalam_Hills

https://en.wikipedia.org/wiki/Venkateswara_Temple,_Tirumala

---------------------------------------------------------------

कुंभकोण (**ओवी क्रमांक** ७२) :-

तामीळनाडू राज्यातील जिल्हा तंजावर येथे उत्तर दिशेला नदी कावेरी व दक्षिण दिशेला अरासालर नदी यांच्या मध्ये कुंभकोण क्षेत्र वसलेले आहे. पाश्चिमात्य व हिंदूसंस्कृतीचे केंद्र

असलेल्या कुंभकोण स्थानास दक्षिण भारतातील केंब्रिज असे संबोधतात.

ब्रह्मदेवाचे जीवसृष्टीचे बीज असलेले कुंभ पात्र प्रलय काळी विस्थापित होऊन कुंभकोण क्षेत्री थांबले, अशी आख्यायिका आहे.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Kumbakonam

https://en.wikipedia.org/wiki/Hindu_temples_of_Kumbakonam

---

कन्याकुमारी(**ओवी क्रमांक** ७२) :-

भारताचे दक्षिणेकडील टोक असलेले कन्याकुमारी स्थान तामीळनाडू राज्यात असून नागरकोईल गावापासून जवळ आहे. कन्याकुमारी मंदिरातील देवी कन्याकुमारी

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

वेदिक काळातील आराध्य देवता आहे. ऋषी अगस्त्य यांचे वास्तव्य कन्याकुमारी क्षेत्री होते. श्रीअगस्त्य ऋषी वनौषधी क्षेत्रातील तज्ज्ञ होते. कन्याकुमारी भागात दुर्मिळ वनौषधी आढळतात.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Kanyakumari

-------------------------------------------------------

मत्स्य तीर्थ (**ओवी क्रमांक** ७२) :-

मत्स्य पुराणातील उल्लेखानुसार प्रलयकाळात, मनुचे जहाज सर्व जीव सृष्टीसहीत मत्स्य (श्रीविष्णु) अवताराच्या मदतीने मलय पर्वताच्या शिखरावर सुरक्षित पोहोचले. मलय पर्वत म्हणजे मंगळूरु जवळील दक्षिणदिशेकडे पसरलेला अरबी समुद्रावरील पश्चिम घाट होय.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

श्री चैतन्य महाप्रभुंनी (दि. १८ फेब्रुवारी १४८६ ते १४ जुन १५३४)पयस्विनी नदी, श्रृंगेरी मठ, तसेच मत्स्यतीर्थ या ठिकाणी भेट दिल्याची नोंद आढळते. ह्या नोंदीनुसार १५ ते १६व्या शतकात कर्नाटकातील मलबार भागात अरबी समुद्राकाठी मत्स्य तीर्थ असावे. प्राचीन काळी भारताच्या पश्चिम दक्षिण किनारपट्टीस (गोवा, कर्नाटक, केरळ) मलबार क्षेत्र म्हणत असत.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Matsya

*https://en.wikipedia.org/wiki/Malabar_region*

*https://en.wikipedia.org/wiki/Chaitanya_Mahaprabhu*

http://www.harekrsna.com/sun/features/07-13/features2871.htm

---------------------------------------------------------

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

पक्षितीर्थ (**ओवी क्रमांक** ७३) :-

पक्षितीर्थ हे क्षेत्र चेन्नई शहरापासून ५५ कि. मीटर अंतरावरील वेदगिरी टेकडीवर आहे. पक्षीतिर्थ ह्या स्थानाला तिरक्षु कुंदरम असेही नाव आहे.

पक्षितीर्थ ही हिरव्यागार जंगलाने वेढलेली छोटी टेकडी नैसर्गिक सौंदर्याचा ठेवा आहे. ह्या टेकडीच्या माथ्यावर प्रशस्त शिव मंदिर असून, ह्या मंदिराच्या प्रवेशद्वाराकडे जाण्यासाठी चिंचोळी अरुंद बंदिस्त बोळ आहे. शिव मंदिराच्या बाहेरील खडकावर रोज गरुडाच्या आकाराचे दोन पक्षी रोज सकाळी ११:३० वाजता येतात. मंदिराचे पुजारी ह्या पक्ष्यांना दुध भाताचे जेवण देतात. हे जेवण जेवून थोड्या वेळ आराम करुन हे पक्षी उडून जातात. ही परंपरा शतकानुशतके चाललेली आहे.

अशाप्रकारचे पक्षीतीर्थ प्रत्येकाला आपल्या इमारतीच्या गच्चीवर निर्माण करता येईल. रोज सकाळी ११च्या सुमारास दूध भात व पाणी गच्चीवर ठेवले, तर पक्षी येऊन जेवतील. आजच्या सिमेंट जंगलयुगात अश्या पक्षीतीर्थांची खरोखरीच गरज आहे.

संदर्भ :

http://superblinky.com/holy-pilgrimage-to-paxitirth-near-chennai-in-india/

---------------------------------------------------

रामेश्वर धनुष्कोटी (**ओवी क्रमांक** ७३) :-

धनुष्कोटी हे पांबन बेटाच्या समुद्रातील टोकावर वसलेले भूतकालीन शहर आहे. हे स्थान रामनाथपूर (जिल्हा रामेश्वर) जवळील स्थान आहे. ह्या ठिकाणी उष्णप्रदेशीय हवामान आहे. ह्या ठिकाणी शरद ऋतू व हिवाळा दरम्यान पाऊस पडतो.

जास्त पाऊस ऑक्टोबर ते डिसेंबर पडतो. जून ते ऑगस्ट खूप कमी पाऊस पडतो. पांबन स्टेशन येथून धनुष्कोटीकडे जाणारी रेल्वे लाईन १९६४ च्या वादळात नष्ट झाली.

धनुष्कोटीपासून श्रीलंका अंतर २९ कि. मीटर आहे. राम रावण युद्धांत रामाने वानरांच्या सहाय्याने रामसेतू हा पूल समुद्रात निर्माण केला, अशी आख्यायिका आहे.

रावण वध झाल्यावर रावणाचा बंधू बिभीषण यास रामाने श्रीलंकेच्या सिंहासनावर बसविले. रामसेतू पुलावरुन श्रीलंकेवर सतत लोक हल्ले करतील म्हणुन बिभीषणाने प्रभू रामचंद्रास हा पुल तोडण्याची विनंति केली. रामाने भारतातील पाबन बेटालगत समुद्रात धनुष्य बाण मारुन हा पुल तोडला. धनुष्य कोटी= धनुष्याचे टोक =धनुष्याच्या बाणाने पुल तोडला.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

धनुष्कोटी ते श्रीलंका ह्या अंतरात समुद्रात खडक व छोट्या बेटांनी व्यापलेला मार्ग अजुनही अस्तित्वात आहे.

धनुष्कोटी भागातील सततच्या वादळांमुळे तसेच भूगर्बीय बदलांमुळे १९४८ आणि १९४९ साली केलेल्या भारतीय सर्वेक्षणानुसार सुमारे ५ मीटरची जमीन समुद्रात बुडालेली आहे.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Dhanushkodi

https://en.wikipedia.org/wiki/Pamban

---------------------------------------------

कावेरी तीर्थ (**ओवी क्रमांक** ७३) :-

म्हैसूर शहरापासून मंड्या जिल्ह्यात कावेरी नदीतील बेटावर श्रीरंगपटनम् हे रंगनाथ मंदिर आहे. रंगास्वामीचे मंदिर ९व्या शतकात गंगा राजवंशाने उभारलेले आहे.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

श्रीरंगपटनम् बेट येथे कावेरी नदी पश्चिम वाहिनी बनते. कावेरी नदीला तीर्थ मानलेले असून, ह्या ठिकाणी महत्वाची तीन वैष्णव तीर्थे आहेत :-

१ आद्य रंग श्रीरंगपटनम्

२ मध्य रंग शिवसमद्रपटनम्

३ अंत्य रंग श्रीरंगम्

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Srirangapatna

--------------------------------------------------

बहेबोरगाव **(ओवी क्रमांक** ७५) :-

बहेबोरगाव जिल्हा सांगली कराडपासून ७ ते ८ कि. मीटर अंतरावर आहे. ह्या ठिकाणी रामलिंग मंदिर हे कृष्णानदीतील बेटावर गुहेमध्ये आहे. ह्या बेटाला ‘रामलिंग टेकडी’ असे नाव आहे.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

रावण वध केल्यानंतर अयोध्येकडे परतत असताना ह्या ठिकाणी प्रभूरामचंद्र शिवलिंगाची पूजा करायला बसले. तेवढ्यात कृष्णा नदीला पूर आला. कृष्णा नदीच्या महापुराने प्रभू रामचंद्रांच्या पूजेत व्यत्यय येऊ नये, म्हणून मारुतीरायाने आपले दोन्ही बाहू परसवून कृष्णा नदी अडवली. ह्या स्थानास बाहू उपाख्य बहे असे म्हणतात. बहे गावाच्या ह्या आख्यायिकेत रामाने लिंगाची पूजा केली म्हणुन श्रीगुरुचरित्रकार ह्या क्षेत्रास

रामेश्वर= राम + ईश्वर (शिवलिंग) असे संबोधताना दिसतात.

गुहेत असलेल्या रामलिंग मंदिरात सतत पाणी ठिपकत असते. ह्या पाण्याच ठिपकण पावसाळ्यात वाढत नाही किंवा उन्हाळ्यात कमी होत नाही तसेच ठिपकणाऱ्या पाण्याचा स्त्रोत अजून समजलेला नाही.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

रामदास स्वामींनी स्वहस्ते शके १५७३ मध्ये रामलिंग मंदिरामागे मारुतीरायाची स्थापना केली. ह्या रामदासस्वामींच्या ११ मारुतींपैकी बहेगावचा मारुती एक मारुती आहे.

श्रीगुरुचरित्र ४५० वर्षांपूर्वी श्री सरस्वती गंगाधर सारवरे यांनी रचलेले असल्याने, ३६४ वर्षांपूर्वीच्या रामदास स्वामी स्थापलेल्या मारुती मंदिराचा उल्लेख आढळत नाही.

संदर्भ :

http://www.lordhanuman.info/lord-hanuman-temple-maharashtra-bahe-templenear-sangli-established-in-1573/

कोळे गाव (नृसिंहदेव मंदिर) **ओवी क्रमांक** ७६ :-

कोळे गावी (जिल्हा सांगली) भूयारातील श्रीनृसिंहदेवांचे अप्रतिम प्राचीन मंदिर कृष्णा नदीकाठी आहे.

सांगली जिल्ह्यातील, वाळवा तालुक्यात, कृष्णा नदीकाठी पराशर ऋषी (व्यास मुनींचे वडिल) ध्यान करीत

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

असताना त्यांच्या मनःचक्षुपूढे उभी राहिलेली ही मूर्ती आहे, अशी आख्यायिका आहे.एका शाळिग्राम मध्ये श्रीनृसिंहदेवाची अप्रतिम मूर्ती कोरलेली आहे.

संदर्भ :

http://www.kopfkinofabrik.de/watch?v=SyDJX1y_ci8

व्हिडिओ व त्यातील सादरीकरण अप्रतिम असून, आपण प्रत्यक्ष भूयारातील नृसिंहदेवाचे दर्शन घेत आहोत, असे वाटते. (Please use Mozilla Firefox to see this video).

http://www.kopfkinofabrik.de/watch?v=SyDJX1y_ci8

ह्या व्हिडिओ सोबत दिलेल्या माहितीतून, नृसिंहदेव ह्या प्राचीन मंदिराचा इतिहास समजतो.

-----------------------------------------------------

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

**भुवनेश्वरी देवी, भिल्लवडी (ओवी क्रमांक ७७):-**

सांगली जिल्ह्यातील भिल्लवडी येथे प्राचीन भुवनेश्वरी देवी मंदिर आहे. हे स्थान औदुंबर क्षेत्राच्या समोर कृष्णा नदीच्या दुसऱ्या तीरावर आहे.

मानवाने केलेल्या वाळू उपसा अतिक्रमणाने येथील कृष्णा नदीच्या पाण्यातील मगरींचे जीवन धोक्यात आलेले आहे. त्यामुळे मगरींच्या हल्ल्यांनी भिल्लवडी परिसरातील गावकरी त्रस्त झालेले आहेत.

संदर्भ :

http://www.punemirror.in/pune/others/In-Sangli-its-man-against-crocodile/articleshow/47493141.cms

http://bhuvneshwaribhilwadi.blogspot.in/2010/09/bhuvaneshwari-devi.html

http://www.sreedattavaibhavam.org/audumbar/

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

संगमेश्वर (**ओवी क्रमांक** ७८) :-

कृष्णा व वारणा नदी संगमावर हरीपूर येथे शिवमंदिर असून श्रावणी सोमवारी हरीपूर येथे जत्रा भरते. सांगली संस्थानिक कै. गोविंद हरी पटवर्धन यांनी इसवी सन १७६८ मध्ये ह्या शिवमंदिरातील पूजा अर्चा करणाऱ्या ब्राह्मणांना घरे बांधून दिली. तेव्हापासून संगमेश्वर हे ठिकाण हरीपूर नावाने ओळखले जाऊ लागले.

मार्कंडेय ऋषी अल्पवयीन असल्याने, त्यांनी आपल्या शिवभक्तीने यमाला परत पाठविले, अशी पुराणात कथा आहे.

१६ वर्षीय मार्कंडेय ह्या शिव व विष्णु भक्त ऋषी होता. मार्कंडेय हा तरुण ऋषी शिवलिंग सानिध्यात असल्याने

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

यमाने टाकलेला फास शिवलिंगाभोवती वेढला गेला. शिवशंकरानी यमाचा युद्धात अंत केला. परंतु कालचक्र पुढे चालू रहावे म्हणुन मार्कंडेय ऋषी तसेच इतर देवांनी केलेल्या विनंतीने श्रीशंकराने यमाला जिवंत केले. यमाला मृत्युसदनी पाठविणारा म्हणून शिवशंकरास कालान्तक नाव पडले.

श्रीगुरुचरित्रकार सांगतात मार्कंडेय ऋषींची शिवभक्ती आठवत कृष्णा वारणा संगमात स्नान करावे व मनोभावे शिवशंकरास पूजावे.

संदर्भ :

http://www.tourismguideindia.com/sangli.htm#sangameshwar-shiva-temple,-haripur

---

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

## अमरापुर क्षेत्र नरसोबाची वाडी (**ओवी क्रमांक** ८०):-

कोल्हापुर जिल्ह्यातील नरसोबाची वाडी क्षेत्र, सांगली पासून ५१ कि. मीटर अंतरावर आहे. ह्या ठिकाणी श्रीदत्तात्रेयांचे द्वितीय अवतार श्रीनृसिंहसरस्वती सुमारे १२ वर्षे वास्तव्यास होते. ह्या जागेचे प्राचीन नाव अमरापुर असून श्रीनृसिंहसरस्वतीच्या वास्तव्यामुळे ह्या जागेस नृसिंहवाडी उर्फ नरसोबाची वाडी असे नामकरण झाले. नृसिंहमंदिरात श्रीनृसिंहसरस्वतींच्या पादुकांची प्रतिष्ठापना केलेली आहे. हे मंदिर कृष्णा नदीकाठी असून ह्या जागी पंच नद्यांचा ( कृष्णा, वेण्णा, उर्मोदी, तारळी, कोयना ) संगम आहे.

संदर्भ :

http://www.holydestinations.in/articles/index.php?article=80

https://en.wikipedia.org/wiki/Narsobawadi

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

http://www.sreedattavaibhavam.org/srikshetra-amarapur/

-------------------------------------------------------

## जुगालय तीर्थ खिद्रापूर (जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र)

(**ओवी क्रमांक** ८३ ) :-

जुगालय= जुग (शिवशंकर व श्रीविष्णु जोडी) + आलय (घर)

महाराष्ट्रातील अमरापूर (नरसोबाची वाडी) पासून जुगुळ हे गाव ९७.५ कि. मीटर अंतरावर कर्नाटकात आहे.

जुगुळ येथील कृष्णा नदी १० मिनिटांत ओलांडल्यावर समोर खिद्रापूर (जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र) येथे कोपेश्वर हे अप्रतिम शिल्पकाम असलेले मंदिर आहे. हे मंदिर ७ व्या शतकात चाल्युक्य राजवटीत उभारलेले आहे.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

ह्या मंदिरात विष्णु व शिवशंकर दोघेही लिंग स्वरुपात आहेत. मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केल्यावर प्रथम विष्णुचे लिंगरुप दर्शन होते. ह्या लिंगाशेजारी शिवलिंग आहे. ह्या मंदिरात शंकराच्या पिंडीपुढे नंदी नाही.

ह्या मंदिराच्या आख्यायिकेनुसार, शंकर पत्नी सतीने वडिलांनी (दक्षराजा) केलेला अपमान सहन न झाल्याने माहेरच्या यज्ञकुंडात उडी घेतली. ही बातमी समजल्यावर शिवशंकर कोपले. त्यांनी रागाच्या भरात स्वतःच्या सासऱ्याचे मुंडके उडविले. विष्णुने समजूत घातल्यावर शिवशंकराने दक्षराजाला बोकडाचे मस्तक जोडून जिवंत केले. रागावलेल्या श्रीशंकराचा राग शांत करण्यासाठी श्रीविष्णु जुगुळ येथे कृष्णा नदीकाठी घेऊन आले.

शिवशंकर रागावलेले असल्याने जुगुळ येथील मंदिरास कोपेश्वर मंदिर म्हणतात.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

कोपेश्वर मंदिरात शिवशंकर व श्रीविष्णु असे दोघे देव लिंगरुपात जोडीने असल्याने, श्रीगुरुचरित्रकार ह्या मंदिरास जुगालय म्हणजे शिवशंकर व श्रीविष्णु ह्या जोडीचे घर असे म्हणतात.

संदर्भ :

http://sadanandsafar.blogspot.in/2014/10/kopeshwar-shiva-temple-hidden-gem-in.html

---------------------------------------------------------

शूर्पालय तीर्थ शुर्पाली (जिल्हा अथनी, कर्नाटक)

(ओवी क्रमांक ८३ ) :-

जुगुळपासून ८४ कि. मीटर अंतरावर शुर्पाली हे स्थान जिल्हा अथनी, कर्नाटक येथे कृष्णानदी काठी आहे.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

शूर्पालय= शुर्प (सूप) + आलय (घर)




शुर्पाली येथे सूपाच्या आकाराचे बेट कृष्णानदीत आहे. शुर्प ह्या शब्दाचा अर्थ सूप असल्याने, श्रीगुरुचरित्रकार ह्या क्षेत्रास शूर्पालय म्हणजे सूपाच्या आकाराचे घर म्हणत असावेत. जमखंडी संस्थान पासून ८ कि. मीटर अंतरावर असलेल्या शूर्पाली स्थानी कृष्णा नदीकाठी लक्ष्मी नृसिंह पुरातन मंदिर आहे.

संदर्भ:

https://www.google.co.in/maps/@16.5870927,75.267616,15z

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

छाया भगवती (**ओवी क्रमांक** ८४ )

छाया भगवती मंदिर कृष्णा नदीवर कर्नाटकातील यादगिर जिल्ह्यात शोरापूर पासून २० कि. मीटर अंतरावर आहे. विक्रमादित्त्य राजवटीत हे मंदिर शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. हे मंदिर हिंदू व मुस्लिम ह्या दोन्ही धर्मांतील लोकांचे श्रद्धा स्थान आहे. नारायणपूरपासून ५ कि. मीटर अंतरावर असलेल्या छाया भगवती येथे कृष्णा नदीवर धबधबा आहे.

| |
|---|
| संदर्भ: |
| http://yadgir.nic.in/Tourism.asp |

---------------------------------------------------

कुडाळ संगम (कृष्णा- मलप्रभा संगम) (ओवी क्रमांक ८४):-

कर्नाटक राज्यातील अलमट्टी धरणापासून सुमारे १५कि. मीटर अंतरावर कृष्णा व मलप्रभा नद्यांच्या संगम होतो. कुडाळसंगम स्थानानंतर कृष्णा नदी पूर्व दिशेला श्री शैल्य

पर्वताकडे वहात जाते. कुडाळ संगम स्थानी असलेले शिवलिंग स्वयंभू आहे, अशी लोकांची श्रद्धा आहे.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Kudalasangama

---------------------------------------------------------------

कपिलऋषि विष्णुमूर्ति (**ओवी क्रमांक** ८५):-

भगवद् गीता अध्याय १० श्लोक क्रमांक २६ मध्ये,

श्रीविष्णु अवतार असलेले श्रीकृष्ण भगवान म्हणतात, "सर्व वृक्षांमध्ये अश्वत्थ देवर्षींमध्ये नारद गंधर्वांमध्ये चित्ररथ आणि सिद्धांमध्ये कपिलमुनी मीच आहे".

संदर्भ :

http://bhagawad-geeta.com/Chapter_10.pdf

श्रीकपिल मुनी हे सांख्य तत्वज्ञानाचे जनक आहेत. श्री कपिल मुनी हे कर्दम मुनी व देवहुती ह्या दांपत्याचे पुत्र असून

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

श्रीदत्तगुरुंचे मामा (सती अनसूयाचे बंधू व गुरु) होते. कपिल मुनींच्या सांख्य तत्वज्ञानाचा बौद्ध व जैन धर्मांनी स्विकार केलेला आहे.

स्वामी विवेकानंदांनी कपिल मुनींविषयी म्हटले आहे, “जगाला ज्ञात असलेला महान मानस शास्त्रज्ञ म्हणजे कपिल मुनी होत. जगातील कोणतेही तत्वज्ञान कपिलमुनींचे ऋण मानल्याशिवाय पूर्ण होणार नाही.”

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Kapila

---

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

अहोबळ (**ओवी क्रमांक** ९०) :-

अहोबळ हे तीर्थ क्षेत्र जिल्हा कर्नुल आंध्र प्रदेश येथे आहे. ह्या स्थानी नृसिंहदेवानी भक्त प्रल्हादाला दर्शन देऊन हिरण्यकश्यपुचा वध केला, अशी आख्यायिका आहे.

इसवी सन १९५४ पर्यंत चेन्चू जमातीच्या लोकांचे येथे वास्तव्य होते. हे लोक जंगलातील बांबू व मध गोळा करुन आपला उदर निर्वाह करीत. सध्या इथे चेन्चूं जमातीची २-४ घरे आहेत.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Ahobilam

---

श्रीगिरी (श्रीशैल्य पर्वत, आंध्रप्रदेश) (**ओवी क्रमांक** ९०) :-

श्रीगुरुंनी तीर्थयात्रेच्या शेवटी आंध्रप्रदेशातील कर्नूल जवळील पाताळ गंगा व कृष्णा नदी यांच्या संगमावर असलेल्या नल्लमला ई

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

पर्वतरांगांतील श्रीशैल्य पर्वतावर सर्व शिष्यांना बहुवस संवत्सरात भारतीय पंचागानुसार वर्षाचे नाव बहुवस एकत्रित होण्यास सांगितले श्रीगुरु तिथे सर्व शिष्यांना भेटणार होते येथे मल्लिकार्जुन हे १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक लिंग असून मल्लिका (पार्वती) + अर्जुन (शंकराचे नाव) असे शिव शंकराचे पूर्णावतार मानलेले लिंग आहे.

संदर्भ :
http://www.holydestinations.in/articles/index.php?article=56

-----------------------------------------------------

**पर्यावरण जीव सृष्टी संवर्धन :-**

श्रीगुरुंनी नदीकिनारी तीर्थ यात्रा करताना खेकड्यांना त्रास देऊ नका, हा संदेश दिलेला आहे. ग्रामीण भागातील गावकऱ्यांच्या निरीक्षणानुसार, साधारण कोजागिरी पौर्णिमेपासून सुमारे दोन महिने खेकडे नदीच्या पाण्यात आढळतात. याचा अर्थ हे खेकडे

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

आपली परिपक्व झालेली अंडी, नदीच्या पाण्यात पुढील प्रजोत्पनासाठी ह्या दोन महिन्यात सोडतात. त्यांना अटक करु नका म्हणजे पकडू नका. खेकड्यांचे प्रजोत्पादन सुरक्षित रहावे, मानवाचा त्यांना त्रास होऊ नये, हा निसर्ग संवर्धनाचा संदेश श्रीगुरुचरित्रकार देतात

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Crab

**प्रदूषणमुक्त पर्यावरण :-**

उन्हाळ्यात बाष्पीभवन होत असते.

बाष्पीभवन झालेला पाण्याचा अणू वातावरणातील जलाशयात सरासरी ९ दिवस रहातो. उन्हाळ्यात नदीच्या पाण्याचे बाष्पीभवन सुरु झाले की, नदीला १० दिवस वर्ज्य करावे, असा अर्थ असावा.

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

बाष्पीभवन होत असताना, नदीचे भरपूर पाणी ढगात गेल्यास, वळवाचा पाऊस व्यवस्थित पडू शकेल, अन्यथा मनुष्याकडून वळवाच्या पावसाच्या पाणी- स्त्रोताची हानी होऊ शकते म्हणून १० दिवस बाष्पीभवन काळात (उन्हाळ्यात) नदीत उतरु नका, असे श्रीगुरुचरित्रकार सांगतात.

संदर्भ :

https://en.wikipedia.org/wiki/Water_cycle

४५० वर्षांपूर्वी सिंहस्थ ह्या संकल्पनेत सिंह राशीत गुरु ग्रह प्रवेश झाल्यावर, गंगा नदी सर्व तीर्थांमध्ये प्रवेश करते, ही कल्पना असावी. ही गंगा नदी म्हणजे पृथ्वीच्या पोटातील पाण्याचा स्त्रोत असणारी भूगंगा (भागवती) असावी.

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

२० - २१व्या शतकात सिंह राशीत गुरु प्रवेश झाल्यावर, सिंहस्थ कुंभमेळा, त्रिंबकेश्वर -नाशिक (गोदावरी नदी) व उज्जैन (क्षिप्रा नदी) ह्या ठिकाणी साजरा होतो.

४५० वर्षांपूर्वी परधर्मीय आक्रमणांमुळे कुंभमेळा आयोजन होत नसावे. कन्याराशीत गुरु ग्रह प्रवेश झाल्यावर, कृष्णा नदीवर कन्यागत व तूळ राशीत प्रवेश झाल्यावर तुंगभद्रा नदीवर तुळागत असा उल्लेख श्रीगुरुचरित्रकार करतात. परंतु कन्यागत व तुळागत यांच्या स्थानांचे उल्लेख आढळत नाहीत.

नरसोबाची वाडी येथे कन्यागत कृष्णा नदीवर अजुनही २१ शतकात साजरे होते.

श्रीगुरुचरित्रातील सिंहस्थ, कन्यागत, तूळागत स्थानांच्या अनुल्लेखनावरुन, श्रीनृसिंह सरस्वतींच्या काळात समाज, परधर्मीय

आक्रमणांनी घेरला गेला होता. त्यांचे धार्मिक स्वातंत्र्य नष्ट झाले होते.

श्रीनृसिंह सरस्वतींनी स्वतः भूमीगत राहून, धर्म जागृतीची मोहिम प्रचंड मोठ्या प्रमाणात राबविलेली दिसते. ही मोहिम राबविताना खेकड्यांसारख्या प्राणीमात्रांचे संरक्षण केलेले दिसते. संगमाच्या ठिकाणी भरपूर पाण्यात स्नान करा, असे श्रीगुरु सांगतात. नदी उगमापाशी तसेच संगमापाशी स्नानाचा विचार श्रीगुरु मांडत नाहीत.

सध्याचे जलचक्र शास्त्र सांगते

| | |
|---|---|
| जलचक्र शास्त्र<br>(Average reservoir residence times)<br>संदर्भ :<br>https://en.wikipedia.org/wiki/Water_cycle | |
| समुद्र | ३२०० वर्षे |

# ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

| | |
|---|---|
| हिमनद्या | २० ते १०० वर्षे |
| जमिनीतील ओलावा | १ ते २ महिने |
| जमिनीवरील उथळ पाणी | १०० ते २०० वर्षे |

श्रीगुरुंनी समुद्र स्नान, हिमनद्या उगम येथे स्नान करा, असे सांगितलेले दिसत नाही.

गोदावरी नदी किनाऱ्यावरुन तटाकयात्रा करा, असे श्रीगुरु सांगतात; परंतु गोदावरीचा उगम असलेल्या ब्रह्मगिरी पर्वतावर तसेच त्रिंबकेश्वर येथील कुशावर्त कुंडात स्नान करा, श्रीगुरु असे सांगताना दिसत नाहीत. कारण जलशास्त्र तत्त्वानुसार, ब्रह्मगिरी पर्वतावरील लाव्हारसातील पाणी हेच गोदावरी नदीच्या उगमाचे स्त्रोत आहे.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

मध्य प्रदेशातील माती ओलावा धरते. नर्मदा नदीवरील कोटि रुद्र तीर्थांचे दर्शन घ्या, असे श्रीगुरु सांगतात. नदीत स्नान करा, असे श्रीगुरु सांगताना दिसत नाहीत.

तीर्थ यात्रेची सुरवात काशी क्षेत्राने करण्यास श्रीगुरु सांगतात. परंतु काशी क्षेत्री गंगा नदीत स्नान करा, असा आदेश न देता श्रीगुरु गंगा नदीची सेवा करा; म्हणजे गंगा नदी स्वच्छ करा, असे सांगतात. गंगा प्रदुषणमुक्ततेची मुहुर्तमेढ ५५० वर्षांपूर्वी श्रीगुरुंनी केलेली दिसते. २१व्या शतकात तरी गंगा प्रदुषणमुक्त होणार का ?

प्रयागच्या त्रिवेणी संगमातील गंगा नदीस इतिहासकालीन सरस्वती नदी माना. सरस्वती नदीचे प्राचीन भारतीयांवरील ऋण भारतीय संस्कृती ह्या ठिकाणी अधोरेखीत करते.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय॥

**अध्याय** पंधरावा तीर्थयात्रानिरुपण

श्रीगुरुचरित्रकारांनी सांगितलेली, भारतीय तीर्थ प्राचीन संहिता गुगल सर्च ह्या अप्रतिम इंजिनमुळे समजू शकली. गुगल सर्चला मनःपूर्वक धन्यवाद.

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥